मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २५२ ■ सोमवार, २५ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## थोड क्यात

### महिलेला मारहाण आणि मानसिक त्रास देऊन छळ केल्याप्रकरणी तिघां विरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** महिलेला शिवीगाळ, मारहाण आणि मानसिक त्रास देऊन छळ केल्याप्रकरणी पती, सासू आणि सासरे यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 22 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी महिला यांचे 2010 मध्ये लग्न झाले. त्यावेळी त्यांचे पती, सासू, सासरे हे खारघर, सेक्टर 8 येथे राहत असून त्यांनी महिलेला शिवीगाळ आणि मारहाण केली. तसेच मानसिक त्रास देऊन छळ केला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### अपघातात तरुण जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** वाहन भरधाव वेगाने चालवून स्लीप झाल्याने झालेल्या अपघातात आयुष रेडेलवार (राहणार बाळाघाट, मध्य प्रदेश) हा तरुण जखमी झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 22 मे रोजी करण्यात आली.22 मे रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास शिवगंगा रिसॉर्ट जवळ आयुष हा मोटरसायकल क्रमांक एम एच ०६ बी एल 370 घेऊन भरधाव वेगाने जात होता. त्यावेळी रस्त्याच्या स्पीड ब्रेकर वरून त्याची मोटर सायकल स्लिप झाली आणि तो खाली पडला. या अपघातात तो गंभीर जखमी झाला.

### पर्स खेचून चोरी करणाऱ्याला घेतले ताब्यात

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : महिलेकडील पर्स चोरून पळून जाणाऱ्या विधी संघर्ष बालकाला तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून तळोजा, कामोठे, खारघर पोलीस ठाण्यातील पाच गुन्हे उघडकीस आले. पोलिसांनी एक लाख 85 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.17 एप्रिल रोजी सकाळी सव्वा सहाच्या दरम्यान मॉर्निंग वॉक करत असताना मोटरसायकलवर आलेल्या तीन अनोळखी इस्मानी शशिकला मिश्रा (राहणार तळोजा फेस टू) यांची पर्स खेचून त्यातील मोबाईल आणि इतर मुद्देमाल चोरी करून नेला होता. तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तळोजा, खारघर, कामोठे, सानपाडा, वाशी, मानखुर्द, चेंबूर, गोवंडी, टिळक नगर या ठिकाणचे एकूण 120 सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि आरोपी निष्पन्न करून तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या मदतीने विधी संघर्ष बालकाला ताब्यात घेऊन 23 मे रोजी कर्जत येथील बाल सुधार गृहात ठेवण्यात आले.

### पनवेल मध्ये एकाची हत्या, गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका इसमाला मारहाण केल्याने त्यात त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला.सलीम अन्वर शेख असे हत्या झालेला इसमाचे नाव असून त्याला काही इसमानी मिळून मारहाण केली. या मारहाणीत सलीम गंभीर जखमी झाला. त्यानंतर त्याचा मृत्यू झाला. याची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

# काशीद समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकाचा जीव वाचवण्यात प्रशासनाला मिळाले यश

## रोबोटिक बोयो" ची उपयुक्तता पुन्हा झाली अधोरेखित

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** दोनच दिवसापूर्वी पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तीला वाचविण्यासाठी उपयुक्त ठरलेल्या "रोबोटिक बोयो" जीवरक्षक यंत्राचे प्रात्यक्षिक कोकण विभागीय आयुक्त श्रीमती रुबल अग्रवाल यांच्या उपस्थित नागाव बीच येथे घेण्यात आले होते. यावेळी रोबोटिक बोयोच्या कार्यपद्धतीविषयी जाणून घेतल्यानंतर त्यांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली की, "रोबोटिक बोयो" हा खऱ्या अर्थाने जीवन रक्षक.असून भविष्यात समुद्रातबुडणाऱ्या व्यक्तींचे प्राणवाच विण्यासाठी देवदूत ठरेल.

आणि दोनच दिवसात. याची प्रचीती उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी काशीद



बीचवर आलेल्या एका पुणेकर कुटुंबावर काळाने झडप घातली होती. यावेळी आली, पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडणाऱ्या एका 20 वर्षीय तरुणीला"रोबोटिक बोयो"साय्याने वाचविण्यात यश आले असल्याने रोबोटिक बोयो" ची उपयुक्तता पुन्हा झाली अधोरेखित झाली पोलिसांच्या प्रसंगावधान आणि तत्परतेमुळे हा मोठा अनर्थ टळला असून, पुणेकर कुटुंबांतील20 वर्षीय तरुणीलासमुद्रात पोहत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने समुद्रात बुडताना अगदी ऐनवेळी सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या माध्यमातून खरेदी करण्यात आलेल्या "रोबोटिक बोयो" ची उपयुक्तता या प्रसंगामुळे पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. या रिमोट ऑपरेटेड वॉटरक्राफ्टमुळे वीस वर्षीय तरुणीचा जीव वाचविण्यास प्रशासनाला यश मिळाले आहे.

आज सकाळी 7.40 वाजताच्या सुमारास, पुणे येथील रहिवासी असलेले आकाश साबळे आणि सिद्धी साबळे हे आपल्या कुटुंबासह काशीद समुद्रकिनाऱ्यावर पर्यटनासाठी आले होते. हे कुटुंब पोहण्यासाठी पाण्यात उतरले. परंतु, पाण्याचा अंदाज न आल्याने सिद्धी साबळे (वय 20वर्षे) ही तरुणी अचानक समुद्राच्या खोल पाण्यात ओढली जाऊ लागली आणि बुडत असल्याचे लक्षात आले. या कठीण प्रसंगी कर्तव्यावर असलेले पोलीस शिपाई (बकल नंबर 1028) प्रविण रोटकर आणि पोलीस शिपाई (बकल नंबर 1531३१) जितेंद्र माने यांनी जराही वेळ न गमावता तात्काळ धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून या पोलीस कर्मचाऱ्यांनी वॉटरक्राफ्टच्या (रोबोटिक बोयो) मदतीने वेगाने समुद्रात धाव घेतली बुडणाऱ्या सिद्धी साबळे हिला सुखरूप बाहेर काढले.या देवदूत ठरलेल्या रोबोटिक बोयो, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि पोलीस कर्मचाऱ्यांचे सर्वांनी आभार मानले आहेत.

## कामोठे प्रभाग समिती ‘क’ अंतर्गत अनधिकृत फेरीवाले व अतिक्रमणांवर विशेष कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘क’ कामोठे अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार अतिक्रमण विभागाच्या वतीने नुकतीच विविध ठिकाणी अनधिकृत फेरीवाले, हातगाड्या तसेच जाहिरात टेम्पो यांच्यावर विशेष कारवाई करण्यात आली.

कामोठे विभागातील मानसरोवर रोड, खांदेश्वर रेल्वे स्टेशन रोड, गणपती मंदिर परिसर, सेक्टर 18 नीलकंठ स्वीट परिसर, क्विसस बँक समोरील परिसर, मोठा खांदा हायवे जवळील सेक्टर 22 तसेच कजरी समोरील फुटपाथ परिसरात ही कारवाई करण्यात आली.सदर कारवाई मा. सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रुपाली माने यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

या कारवाईदरम्यान फुटपाथ व सार्वजनिक रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय



करणाऱ्या फेरीवाल्यांच्या हातगाड्या, टेम्पो तसेच विविध साहित्य जप्त करण्यात आले. नीलकंठ चौक येथून आईस्क्रीम व केएफसीची हातगाडी जप्त करण्यात आली. ही गाडी तसेच 1 हातगाडी व 1 अनधिकृत जाहिरात टेम्पो जप्त करून सुवर्णदुर्ग कार्यालय, कामोठे येथे जमा करण्यात आले.

अतिक्रमण विभागाने केलेल्या कारवाईमध्ये एकूण 18 सिलेंडर, 18 हातगाड्या, 15 आईस्क्रीम गाड्या, 1 जाहिरात टेम्पो, 2 शिलाई मशीन, 17 खुर्च्या, 3 टेबल, 1 वजन काटा, 2 तवे, 1 चायनीज काउंटर तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले. अनधिकृतरीत्या आंबे विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवरही कारवाई करून त्यांच्या गाड्या व आंब्याच्या पाट्या जप्त करण्यात आल्या.

सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि वाहतूक व्यवस्थेमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत व्यवसायांवर पुढील काळातही नियमितपणे कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अतिक्रमण विभागामार्फत अधिक्षक दशरथ भंडारी यांनी दिली आहे.

प्रभाग समिती क कामोठे मध्ये सोमवार ते बुधवार व गुरुवार लागणाऱ्या आठवडे बाजारांवर अतिक्रमण विभागाने तोडक कारवाई करून हे बाजार बंद केले आहेत.

## शासकीय नोकरीतील आपल्या जबाबदारीचे पालन चांगल्या रीतीने करावे : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : केंद्र सरकारच्या नोकरीमध्ये रुजू होणाऱ्या नवनियुक्तांनी देशाच्या विविध भागात सेवा करताना आपल्याला मिळालेल्या जबाबदारीचे चांगल्या रीतीने पालन करण्याचे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर मध्ये केले .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथून 19व्या रोजगार मेळाव्या अंतर्गत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून देशातील 47 ठिकाणी आयोजित रोजगार मिळाव्यात 51 हजार नवनियुक्तांना नियुक्तीपत्र वाटप केले याप्रसंगी नागपूरच्या राज नगर स्थित राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय एनएफएससी येथे आयोजित रोजगार



मेळाव्या प्रसंगी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मित्र नितीन गडकरी बोलत होते .यावेळी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता प्रामुख्याने उपस्थित होते .

गडकरी यांच्या हस्ते केंद्र शासनाच्या विविध विभागात नव्याने नियुक्त झालेल्या 308 जणांना नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले.

याप्रसंगी त्यांनी नवनियुक्तांना संबोधित करताना सांगितलं की , व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होणे आवश्यक आहेच सोबतच राष्ट्रीय आणि सार्वजनिक जीवनात देखील सेवा करणे आवश्यक आहे.

नागपुरात आयोजित रोजगार मेळाव्यात मध्य रेल्वे , दक्षिण पूर्व मध्य रेल्वे , डाक विभाग , ट्रीपल आयटी ,एम्स , टपाल विभाग यासारख्या विविध केंद्र शासनाच्या विभागात या नवनियुक्तांना नेमणूक मिळणार आहे .

## पनवेल एसटी स्टँडवर मनसेचा दणका

### महिला प्रवाशांशी उद्धट वर्तन करणाऱ्या मुजोर कर्मचाऱ्यांना 'मनसे स्टाईल'ने शिकवला धडा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** महाराष्ट्राच्या विविध भागांतून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांसाठी पनवेल एसटी बस स्थानक हे एक महत्त्वाचे केंद्र आहे. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या स्थानकावरील शौचालयाच्या व्यवस्थापनाबाबत प्रवाशांकडून, विशेषतः महिला प्रवाशांकडून अनेक गंभीर तक्रारी प्राप्त होत होत्या. मुंबईकडे जाण्यासाठी रात्रीच्या वेळेस असंख्य प्रवासी या स्थानकावर येत असतात. अशा वेळी, विशेषतः रात्री 11 वाजल्यानंतर, तेथील शौचालय बंद केले जात होते आणि हक्काच्या सुविधेसाठी विचारणा करणाऱ्या महिला प्रवाशांशी तिथे कार्यरत असलेले कर्मचारी अत्यंत उद्धट व अरेरावीचे वर्तन करत होते. हा सर्व त्रास सहन न झाल्याने प्रवाशांनी या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे (मनसे) दाद मागितली होती.

तक्रारींचा ओघ वाढताच मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी थेट पनवेल एसटी स्टँडवर धडक दिली. प्रवाशांकडून रीतसर पैसे घेतले जात असताना रात्रीच्या वेळी शौचालय बंद का ठेवले जाते, असा जाज्वल्य प्रश्न कार्यकर्त्यांनी उपस्थित केला. यावेळी तिथे पोलीस कर्मचारीही मध्यस्थीसाठी हजर होते. मनसे कार्यकर्त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांना व कंत्राटदाराला 'मनसे स्टाईल'ने कडक शब्दांत समज दिली की, यापुढे प्रवाशांची, विशेषतः महिलांची कोणतीही गैरसोय खपवून घेतली जाणार नाही. मनसेच्या या आक्रमक पवित्र्यापुढे अखेर प्रशासनाला नमते घ्यावे लागले असून, आता हे शौचालय प्रवाशांसाठी 24 तास (24÷7) खुले करण्यात आले आहे. मनसेच्या या धडक कामगिरीमुळे रात्री-अपरात्री प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## श्री रुपालाल महाराज राष्ट्रीय स्मारकासाठी चर्चा मंथन शासकीय विश्रामगृहात बैठक ; प्रस्तावामधील त्रुटी पूर्ततेवर चर्चा !

**दैनिक युवक आधार**

**अंजनगाव सुर्जी संतोषराव घोडेराव,तालुका प्रतिनिधी** : श्री संत शिरोमणी रुपालालजी महाराज राष्ट्रीय स्मारक विकास आराखडा ता.अंजनगाव सुर्जी या प्रस्तावामधील त्रुटी पूर्तता तसेच प्रस्ताव पुढील कारवाई करण्यासाठी पाठविण्याकरता शुक्रवारी दुपारी १ वाजता शासकीय विश्रामगृहात एक बैठक पार पडली. बैठकीमध्ये उपविभागीय अभियंता अघम,दर्यापूर व उपविभागीय अभियंता राऊत अंजनगाव सुर्जी उपस्थित होते.वर्षापूर्वीच शासनाकडे सादर झालेला ८० कोटी २६ लाखाचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला असे उपविभागीय अभियंता अगम यांचे कडून सांगण्यात आले तसेच येवढा



मोठा निधी स्मारकाला या स्तरावर देता येत नाही हे सुध्दा सांगण्यात आले.स्मारकामध्ये मंदिर, संत रुपालाल महाराजांची भव्य मूर्ती, रस्ता व पुल देता येत नाही अस सांगण्यात आले. यावरून एकंदरीत शासनाला निधीमध्ये काटछाट करून निधी श्री संत रुपालाल महाराज स्मारकाला द्यायचा आहे असे या बैठकीतून समजले.

पण या मुख्य बाबीवर अखिल भारतीय बारी महासंघाने आपली भूमिका मांडून अमरावतीच्या बैठकीमध्ये जो प्रस्ताव देण्यात आला होता तोच शासनाने कायम ठेवावा.ज्यामध्ये श्री संत रुपालाल महाराजांची भव्य मूर्ती, मंदिर, रस्ता व नाल्यावरील पूल यांचा समावेश होता जर शासनाला रस्ते व पूल यामध्ये होणारा खर्च झेपत नसेल तर शासनाने हायवे रोडवरील कुठलीही जमीन भूसंपादन करून राष्ट्रीय स्मारकाकरिता द्यावी अशी ही भूमिका यावेळी बारी महासंघाच्या वतीने मांडण्यात आली.

**शासनाच्या भूमिकेकडे लक्ष !**

यावेळी अखिल भारतीय बारी महासंघाच्या वतीने सुरेश भोंडे, नीलेश डोंगे, मनोहर मुरकुटे, उमेश भोंडे, रमेश धुळे, दीनेश भोंडे यांनी आपली बाजू उपस्थित अधिकारी यांच्या समोर मांडली. अखिल भारतीय बारी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेशचंद्र घोलप यांनी सुध्दा शासनाने दिलेले नवीन प्रस्ताव अगण्य आहे. पूर्वीच शासनाने जुन्या ८० कोटी २६ लाखाचा प्रस्ताव हाच मान्य करावा अशी आग्रह भुमिका महासंघाच्या वतीने घेण्यात आली. ह्याबाबत पुढील दिवसात शासन योग्य भुमिका घेणार काय याकडे सर्व समाज बांधवांचे लक्ष लागले आहे.

# जेएनपीएने बदलले पनवेल-उरणवासीयांचे जीवनमान

## वाढवण बंदरामुळे होणार पालघर जिल्ह्याचा कायापालट



**दैनिक युवक आधार**
**ठाणे प्रतिनिधी :** जेएनपीए (JNPA - जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटीज), न्हावा शेवा बंदरामुळे पनवेल, नवी मुंबई आणि उरण विभागाचा औद्योगिक व पायाभूत विकास झाला असून, या परिसराचे रूपांतर एका प्रमुख व्यापारी केंद्रात झाले आहे. या बंदरामुळे स्थानिक रोजगार, वाहतूक व्यवस्था आणि नागरीकरण यामध्ये मोठी वाढ झाली आहे. जेएनपीए आता पालघर जिल्ह्यातील वाढवण येथील महत्वाकांक्षी बंदर उभारणी प्रकल्प हाती घेत असल्यामुळे उरण - पनवेल प्रमाणेच पालघर जिल्ह्याचा देखील कायापालट होणार आहे.

उरण आणि पनवेल परिसरात वेअर हाउसेस, कंटेनर डेपो (CFS) आणि विविध उद्योगांचे जाळे निर्माण झाले आहे. याचाच परिपाक म्हणून लाखो अप्रत्यक्ष रोजगार आणि व्यवसाय संधी देखील निर्माण झाल्या. रस्ते, रेल्वे आणि दळणवळणाच्या साधनांमध्ये सुधारणा होऊन हा भाग मुंबई आणि इतर भागांशी जोडला गेला आहे. थेट बंदर आणि संबंधित उद्योगांमुळे स्थानिक लोकांच्या रोजगारात वाढ झाली आहे. बंदराच्या विकासामुळे या भागात नागरीकरण वाढले असून, निवासी संकुले आणि व्यापारी पेठा विकसित झाल्या आहेत. उरण भागातील मोरा व आजूबाजूच्या जेट्टींमुळे जलवाहतूक सुलभ झाली आहे.

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण बंदरामुळे कुशल व अकुशल कामगारांना हाताला काम मिळाले व त्याचा घसघशीत मोबदला देखील मिळत गेला. परिणाम स्वरूप येथील रहिवाशांचे जीवनमान सुधारले. पनवेल आणि उरण परिसरामध्ये या एका बंदराच्या येण्याने सुबत्ता आली. आर्थिक स्तर उंचावल्यामुळे या परिसरातील गुंतवणूक वाढली. शैक्षणिक स्तर वधारला, उत्तमोत्तम शैक्षणिक संस्था या विभागामध्ये स्थिरावल्या.

कस्टम क्लिअरिंग एजंट, टेम्पो वाहतूक, कलमार क्रेन, हायड्रा वाहतूक, ट्रेलर व्यवसाय अशा अनेक व्यवसायाच्या संधी स्थानिक तरुणांना उपलब्ध झाल्या आहेत. साधारणपणे गेल्या ३७ वर्षांमध्ये जेएनपीएच्या बंदरामुळे पनवेल उरण वासियांचे जीवनमान संपूर्णतः पालटून गेले आहे. परंतु आता जेएनपीए त्यांच्या विस्तारित बंदराचे काम सुरू करत असल्याने अशाच प्रकारच्या विकासाची संधी पालघर जिल्ह्याला निर्माण झाली आहे. या बंदरामुळे अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे.

# आगरी समाजाच्या विकासाला माझे सर्वप्रथम प्राधान्य : महेंद्रशेठ घरत

## कर्जतच्या आगरी समाज सभागृहाचे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते शानदार उदघाटन!

**दैनिक युवक आधार**
**उलवा प्रतिनिधी :** कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या वातानुकूलित भव्य सभागृहाचे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते शनिवारी (ता. २३) शानदार उदघाटन करण्यात आले. या समारंभाला बदलापूरच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, जिल्हा परिषद सदस्य बाबूशेठ घारे, उद्योजक मयूर पिसे आदी मान्यवर उपस्थित होते.



कर्जतच्या आगरी समाज सभागृहाचे संपूर्ण अत्याधुनिक नूतनीकरण यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी १२ लाख ५० हजार रुपये सढळ हस्ते केलेल्या देणगीतून करण्यात आले आहे. त्यामुळे कर्जत तालुका आगरी समाज संघटनेतर्फे महेंद्रशेठ घरत यांचा यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला. "महेंद्रशेठ घरत हे आगरी समाजातील आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करणारे अवलिया आणि दानशूर व्यक्तिमत्त्व आहेत, याचा कर्जतच्या आगरी समाजाला अभिमान आहे," असे कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "मला आगरी असल्याचा सार्थ अभिमान आहे. आपला समाज मेहनतीने आणि सन्मानाने जगण्याला अधिक प्राधान्य देतो. कुणापुढे कारण नसताना झुकत नाही. ताठ कण्याचा आपला समाज मला प्रिय आहे. त्यामुळे आगरी समाजाच्या उत्कर्षासाठी मी सर्व प्रकारचे सहकार्य करतो. समाजाच्या मागे मी कायमच खंबीरपणे उभा आहे आणि राहीन. कर्जतचा आगरी समाज संघटित होऊन समाजाच्या भल्यासाठी प्रयत्न करतोय. त्यामुळे कर्जतच्या आगरी समाजावर माझे विशेष प्रेम आहे. त्यांच्यासाठी माझा मदतीचा हात कायमच राहील. मी जागतिक पातळीवर कामगारांचे नेतृत्व करीत आहे. त्यामुळे जगभर फिरतो; परंतु मी माझ्या गावाच्या विकासाबाबत संवेदनशील आहे. आज राज्यात रोल मॉडेल ठरेल, असा माझ्या शेलघर गावाचा सुनियोजित विकास मी करून घेतला आहे. आज तिथे ग्रामस्थांना बोट ठेवायला जागा नाही. मी जिल्हा परिषद सदस्य असताना गावोगावी जलकुंभ बांधून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतविला. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्यावर अभ्यास करून अधिकाऱ्यांवर वचक ठेवला आणि विकासात्मक कामे करून घेतली. रायगडमध्ये सी. डी. देशमुख यांच्यानंतर मी जगाच्या व्यासपीठावर नावलौकिक मिळवतोय. तिथेही मी त्या त्या देशांच्या कामगार नेत्यांवर वचक ठेवून आहे."

या समारंभाला बदलापूरच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, जिल्हा परिषद सदस्य बाबूशेठ घारे, उद्योजक मयूर पिसे, कर्जत पंचायत समिती सदस्य भगवान चंचे, नितीन धुळे, रेश्माताई जोशी, मंगेश म्हसकर, विपूल पाटील, तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. हा समारंभ हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील सामाजिक सभागृह नेरळ-बोपेले येथे पार पडला.

यावेळी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, माजी अध्यक्ष नागो गवळी, एकनाथ धुळे, सावळाराम जाधव, कर्जत तालुका कॉंग्रेस अध्यक्ष संजय गवळी, उरण तालुका प्रमुख विनोद म्हात्रे, किरीट पाटील, वैभव पाटील, निखिल ढवळे आणि एम. जी. ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. यावेळी जितेंद्र गवळी यांनी सूत्रसंचालन केले, तर भरत भगत यांनी प्रास्ताविक केले.

# दि. बा. पाटील नामकरणावरून राजकीय रणधुमाळी; ठाकूरांच्या पुढील भूमिकेची उत्सुकता

## "एक तर नाव द्या, नाहीतर राजीनामा द्या !" — मनसे नेते संदीप देशपांडेंचा थेट सवाल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीवरून पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले असून, आता सर्वांचे लक्ष पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातील याचिकेत हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यानंतर आंदोलनाला नवे राजकीय वळण मिळाले आहे.




मनसे नेते संदीप देशपांडे यांनी यावरून आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर थेट निशाणा साधत, "जर दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला दिले नाही तर आमदारकीचा राजीनामा देईन, असे या पूर्वी जाहीरपणे सांगितले होते. मग आता एकतर विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्या, नाहीतर आपला राजीनामा द्या," असा थेट सवाल उपस्थित केला आहे. एकही विमान उडू देणार नाही असे म्हणणारे खासदार बाळ्यामामा( सुरेश )म्हात्रे यांच्या भूमिकेवरही नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर मोठी चर्चा उठवली आहे.

दरम्यान, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला "लोकनेते डी. बी. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ" असे नाव देण्याच्या मागणीसाठी प्रकाशज्योत सामाजिक संस्थेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने आंदोलन करताना सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेण्याचा सल्ला दिला. मात्र, विमानतळ नामकरण हा सरकारच्या धोरणात्मक निर्णयाचा विषय असल्याचे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

यामुळे आता निर्णयाचा संपूर्ण चेंडू राज्य आणि केंद्र सरकारच्या कोर्टात गेला असून, या विषयावर पुढे काय भूमिका घेतली जाणार याबाबत उत्सुकता वाढली आहे.

माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, राज्य सरकारने प्रामाणिकपणे केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवलेला आहे. काही कारणांमुळे हा विषय प्रलंबित राहिला असून, सर्वपक्षीय समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे निर्णय प्रक्रियेला विलंब झाला. मात्र, आगामी काळात त्यांच्या अध्यक्षतेखाली यावर निर्णायक बैठक होणार असल्याची माहिती माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी दिली.

दरम्यान, दि. बा. पाटील यांच्या नावासाठी स्थानिकांमध्ये मोठी भावना असून, विविध संघटना आणि राजकीय पक्ष आक्रमक भूमिका घेत आहेत. अशा परिस्थितीत आमदार प्रशांत ठाकूर नेमकी कोणती भूमिका घेतात, त्यांनी दिलेल्या वक्तव्यावर कितपत ठाम राहतात आणि सरकारवर किती दबाव आणतात, याकडे आता संपूर्ण रायगड आणि नवी मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

# सणसर ग्रामसभेत आरोग्य केंद्राच्या जागेवरून जोरदार खडाजंगी ; विरोधकांचा संताप

## अखेरीस नवीन जागेचा ठराव सर्वानुमते मंजूर

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर ग्रामपंचायत मार्फत रविवार दि. 24 मे 2026 रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागा बदलाचा विषय ग्रामसेवक सचिन पवार यांनी विषय सभेत मांडताच ग्रामस्थांमध्ये तीव्र वाद निर्माण झाला.जुन्या जागेवरच आरोग्य केंद्र ठेवण्याची मागणी करत अनेक ग्रामस्थांनी प्रशासनावर आणि इस्टीमेट तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त केला. छत्रपती कारखाना संचालक शिवाजीराव निंबाळकर, रामचंद्र निंबाळकर,माजी सभापती तुकाराम काळे यांच्यासह बहुसंख्य ग्रामस्थांनी नवीन जागेला ठाम विरोध दर्शवत "गावकऱ्यांच्या भावना डावलून निर्णय घेतला जात आहे" असा आरोप केला. चुकीचे इस्टीमेट तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही यावेळी ग्रामसभेत करण्यात आली.



यासभेवेळी सोसायटीचे माजी चेअरमन सुशील निंबाळकर,माजी चेअरमन सुधीर निंबाळकर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन नाना निंबाळकर,सामाजिक कार्यकर्ते सुमित पाटील,युवा उद्योजक अक्षय निंबाळकर तंटामुक्तीचे उपाध्यक्ष दत्तात्रय काळे यांनी नवीन जागेवर भव्य व सुसज्ज आरोग्य केंद्र उभारण्याची जोरदार बाजू मांडली "ग्रामस्थांना भविष्यात उत्तम आरोग्य सुविधा मिळण्यासाठी नवीन जागाच योग्य आहे,"असे मत यावेळी काही ग्रामस्थ यांनी व्यक्त केले.माजी संचालक रणजित निंबाळकर यांनी जुन्या जागेतील अडचणी आणि भविष्यात निर्माण होणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधत नवीन जागेवर केंद्र उभारणे हाच योग्य पर्याय असल्याचे स्पष्ट केले व हायस्कूलसाठी जो भाडेपट्टा करून देण्यात आलेला आहे त्या जागेचा गटनंबर वेगळा असून प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी देण्यात येणाऱ्या जागेचा गट नंबर वेगळा असल्याची माहिती यावेळी ग्रामसभेत देण्यात आली.सभेचे वातावरण तापले असतानाही अखेर ग्रामसेवक सचिन पवार यांनी सर्वनुमताने नवीन जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याचा ठराव मंजूर झाल्याची घोषणा केली.या निर्णयानंतर सभागृहात काही ठिकाणी नाराजी तर काही ठिकाणी समाधानाचे वातावरण दिसून आले.

या ग्रामसभेसाठी प्रशासक म्हणून सरपंच यशवंत पाटील,माजी सरपंच पार्थ निंबाळकर,विजय आबा पाटील,रणजित निंबाळकर पोलीस पाटील राजेंद्र चव्हाण,मार्केट कमिटी संचालक संग्रामसिंह निंबाळकर,अर्बन बँक संचालक तानाजी निंबाळकर माजी उपसरपंच अभयराजे निंबाळकर सागर भोईटे रोहित पाटील रणजित भगत भागवत पाटील शंभूराजे निंबाळकर हरिभाऊ निंबाळकर सचिन शिंदे दिना पाटील राहुल पाटील शिवाजी काळे आबासाहेब निंबाळकर बजरंग रायते विजय चव्हाण सर पै अजित सोनवणे मोहन सुरडकर भागवत पाटील विशाल रायते प्रशांत निंबाळकर विक्रम वाघ अजित यादव समीर भोईटे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

गावातील विकासकामे दर्जेदार करण्यासाठी गावातील युवकांनी एकत्र येऊन छान प्रकारे करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत अस मत माजी चेअरमन विक्रमभैय्या निंबाळकर यांनी व्यक्त केले. तसेच गावात आणखी जागा उपलब्ध असून तिथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठीच्या जागेबाबत विचार करावा अस मत इंदापूर मार्केट कमिटी संचालक संग्रामसिंह निंबाळकर यांनी व्यक्त केले.

# मुंबई महापौर पॉवरलिफ्टिंग चषक स्पर्धेत खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी; किर्ती कॉलेज येथे स्पर्धा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई - किशोर गुडेकर विभाग प्रतिनिधी प्रमुख :** मुंबई महापौर पॉवरलिफ्टिंग चषक २०२६ स्पर्धा किर्ती कॉलेज येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत मुंबईसह विविध भागांतील खेळाडूंनी सहभाग घेत आपल्या ताकदीचे आणि कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पर्धेमध्ये महिला व पुरुष गटातील अनेक खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करत उपस्थितांची मने जिंकली.



या स्पर्धेत सेजल मकवाना हिने उत्कृष्ट कामगिरी करत "सिनियर स्ट्राँग वूमन" हा किताब पटकावला. तिच्या दमदार खेळामुळे उपस्थितांकडून तिचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच सेजल बेलवलकर हिने "सब-ज्युनिअर स्ट्राँग वूमन" हा बहुमान मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. कमी वयात केलेल्या या यशस्वी कामगिरीमुळे तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सलमा शेख हिने सिनियर ६९ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावत स्पर्धेत आपला ठसा उमटवला. तिच्या मेहनतीचे आणि सातत्यपूर्ण सरावाचे फळ तिला या स्पर्धेत मिळाले. तसेच सोहम कारेकर याने ज्युनिअर १२० किलो वजनी गटात रौप्यपदक मिळवत उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडवले.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना ट्रॉफी, पदके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. खेळाडूंच्या या यशामुळे त्यांच्या कुटुंबीयांमध्ये व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या स्पर्धेमुळे तरुणांमध्ये पॉवरलिफ्टिंग खेळाविषयी आकर्षण वाढत असून भविष्यात असे खेळाडू राज्य व राष्ट्रीय स्तरावरही चमकतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# संघर्ष नायक नारायण बागडे वाढदिवसानिमित्त " अनुसूचित जाती ऐक्य संदेश दिवस "

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे :** विविध समाजघटकांना जातीय अन्यायाचे चटके सहन करावे लागले होते. त्या सर्व पीडित समाजघटकांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एका विचारमाळेत गुंफून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. मात्र आज उपवर्गीकरणाच्या नावाखाली हे ऐक्य तोडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत, त्याला वेळीच लगाम घालण्यासाठी राज्यभरात "अनुसूचित जाती समन्वय अभियान" राबविण्यात येणार असल्याची माहिती आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांच्या वाढदिवसानिमित्त जाहीर करण्यात आली आहे.



२५ मे २०२६ रोजी नारायण बागडे यांच्या वाढदिवसानिमित्त "अनुसूचित जाती ऐक्य संदेश दिवस" साजरा करण्यात येणार असून, त्याअंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात विविध समाजघटकांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमध्ये फूट पडू शकते, हा धोका विविध घटकांना समजावून सांगण्यावर या अभियानाचा भर असणार आहे.

या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात साहित्यभूषण अण्णा भाऊ साठे यांचे जन्मगाव वाटेगाव, जिल्हा सांगली येथे कार्यक्रम होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात अहिल्याबाई होळकर यांचे जन्मगाव चोंडी येथे अभियान राबविण्यात येईल. तिसऱ्या टप्प्यात पोचिराम कांबळे यांच्या जन्मगाव तैरभुनी, जिल्हा नांदेड येथे कार्यक्रम होणार असून, चौथ्या टप्प्यात प्रथम अस्पृश्य परिषदेमुळे ऐतिहासिक ठरलेल्या सुकळी मानगाव, जिल्हा कोल्हापूर येथे अभियानाचा समारोप होणार आहे.या अभियानाद्वारे अनुसूचित जातींमध्ये सामाजिक ऐक्य, समन्वय आणि संविधानिक हक्कांविषयी जनजागृती करण्यात येणार असल्याचे प्रदेश जनसंपर्क प्रमुख डॉ. श्रीकृष्ण बेडसे यांनी माध्यमांना सांगितले.

# पक्षांतरांच्या राजकारणावर गजानन भोयर यांचा घणाघात

## "स्वार्थासाठी रंग बदलणाऱ्यांना जनता योग्य वेळी उत्तर देईल"; संभाजी ब्रिगेडचा आक्रमक इशारा

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय पक्षांतरांच्या मालिकेमुळे संपूर्ण राजकीय वातावरण ढवळून निघाले असताना आता संभाजी ब्रिगेडनेही आक्रमक भूमिका घेत मैदानात उडी घेतली आहे. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन भोयर यांनी पक्षांतरांच्या राजकारणावर जोरदार टीका करत "सत्ता, पद आणि स्वार्थासाठी विचार बदलणाऱ्यांना जनता आता ओळखून आहे. जनतेच्या भावनांशी खेळणाऱ्यांना योग्य वेळी जनता उत्तर देईल," असा थेट इशारा दिला आहे.

गजानन भोयर यांनी प्रसिद्ध केलेल्या संदेशामुळे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून त्यांच्या भूमिकेची सर्वत्र चर्चा रंगली आहे. सध्या विविध पक्षांमध्ये सुरू असलेल्या प्रवेश आणि निर्गमनाच्या राजकारणामुळे सामान्य कार्यकर्ते संभ्रमात असताना संभाजी ब्रिगेडने मात्र ठाम भूमिका घेतल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

गजानन भोयर यांनी आपल्या संदेशातून स्पष्ट शब्दांत सांगितले की, "आज अनेक नेते स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी विचारधारा बदलताना दिसत आहेत. जनतेच्या प्रश्नांपेक्षा स्वतःच्या स्वार्थाला प्राधान्य देणारे हे राजकारण समाजासाठी घातक आहे. मराठी अस्मिता, युवकांचे



प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सामाजिक न्याय यासाठी लढणाऱ्या चळवळींनाच जनता खरा पाठिंबा देणार आहे."

संभाजी ब्रिगेड ही केवळ संघटना नसून जनतेच्या स्वाभिमानाची आणि महाराष्ट्राच्या

> **"जनतेच्या भावनांशी खेळ करून स्वार्थासाठी पक्ष बदलणाऱ्यांना आगामी काळात जनता त्यांची जागा दाखवेल. संभाजी ब्रिगेड आता गप्प बसणार नाही."**
>
> **श्री.गजानन भोयर**
> **विभागीय अध्यक्ष संभाजी ब्रिगेड,**

अस्मितेची चळवळ असल्याचेही गजानन भोयर यांनी अधोरेखित केले. गेल्या काही वर्षांत त्यांनी वाशिम जिल्ह्यात संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले असून युवकांमध्ये त्यांची वाढती लोकप्रियता राजकीय क्षेत्रात चर्चेचा विषय ठरत आहे. सामाजिक प्रश्नांवर आक्रमक भूमिका, अन्यायाविरोधात थेट आवाज आणि सामान्य कार्यकर्त्यांशी असलेला जवळचा संपर्क यामुळे गजानन भोयर यांची प्रतिमा संघर्षशील नेतृत्व म्हणून निर्माण होत आहे.

विशेष म्हणजे, जिल्ह्यातील अनेक युवक आणि सामाजिक कार्यकर्ते आता संभाजी ब्रिगेडकडे आशेने पाहत असल्याचे चित्र आहे. बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, शिक्षणातील अडचणी, मराठी युवकांचे प्रश्न आणि सामाजिक अन्याय यावर सातत्याने भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून गजानन भोयर यांचे नाव पुढे येत आहे. अनेक ठिकाणी त्यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी आंदोलने, निवेदने आणि जनजागृती मोहिमा राबवल्या असून त्यामुळे त्यांचा प्रभाव वाढत असल्याचे बोलले जात आहे.

वाशिम जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या राजकीय घडामोडींमध्ये अनेक नेते पक्ष बदलत असताना संभाजी ब्रिगेड मात्र आपली विचारधारा आणि भूमिका कायम ठेवून जनतेसाठी संघर्ष करत असल्याचे गजानन भोयर यांनी स्पष्ट केले. "जनतेच्या विश्वासावर निवडून येऊन नंतर सत्तेसाठी भूमिका बदलणाऱ्यांविरोधात लोकांमध्ये मोठा रोष आहे," असेही त्यांनी नमूद केले.गजानन भोयर यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे आगामी काळात वाशिम जिल्ह्यातील राजकारण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः युवक वर्गात त्यांच्या वक्तव्याची मोठी चर्चा सुरू असून संभाजी ब्रिगेडच्या संघटनात्मक हालचालींनाही वेग येण्याची चिन्हे दिसत आहेत.


राजकीय स्वार्थासाठी सुरू असलेल्या पक्षांतरांच्या पार्श्वभूमीवर गजानन भोयर यांनी घेतलेली स्पष्ट भूमिका ही सामान्य जनतेच्या मनातील भावना व्यक्त करणारी असल्याची प्रतिक्रिया अनेक स्तरांतून उमटत आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडची भूमिका आणि गजानन भोयर यांचे नेतृत्व जिल्ह्यात महत्त्वाचे ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

---

## संभाजीनगर–जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विगधान परिषदेची उमेदवारी ए .जे . पाटील बोराडे यांना द्यावी – संतोष खारवणे

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे** : संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी शिवसेनेची उमेदवारी जिल्हाप्रमुख ए.जे. पाटील म्हणून परिचित असलेले आसाराम जिजाभाऊ बोराडे यांना द्यावी, अशी मागणी युवासेना उपतालुका प्रमुख मंठा संतोष खारवणे यांनी केली आहे.आसाराम जिजाभाऊ बोराडे हे गेल्या ४० वर्षांपासून शिवसेनेचे निष्ठावंतपणे कार्य करत असून त्यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. ग्रामीण



भागातील सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला असून प्रशासनावर त्यांची मजबूत पकड आहे. लोकांच्या अडीअडचणी सोडविण्याची क्षमता, संघटन कौशल्य व जनसंपर्क यामुळे ते सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय आहेत.त्यामुळे विधान परिषदेसाठी ते सक्षम,अनुभवी व जनतेच्या प्रश्नांना न्याय देणारे उमेदवार ठरु शकतात.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात शिवसेनेची ताकद आहे व त्यांचा राजकीय अनुभव व कार्य पाहता पक्षाला विजय मिळवून देण्यासाठी आसाराम जिजाभाऊ बोराडे यांच्यासारख्या अनुभवी व अभ्यासू नेतृत्वाला उमेदवारी देणे आवश्यक असल्याचे संतोष खारवणे यांनी म्हटले आहे. पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना उमेदवारी जाहीर करावी, अशी अपेक्षाही श्री खारवणे यांनी व्यक्त केली.

## नव्या कायद्यामुळे बेरोजगारीच्या खाईत लोटण्याची भीती ; माथाडी कामगारांचे २५ आणि २६ तारखेला धरणे आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, (प्रतिनिधी)** : महाराष्ट्र राज्यातील तालुका न्याय शासकीय धान्य गोदामामध्ये काम करणारे कामगार महाराष्ट्र सुरक्षा रक्षक व माथाडी कामगार कृती समितीच्या नेतृत्वाखाली दिनांक २५ व २६ मे २०२६ रोजी राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार आहेत, अशी माहिती हिंद मजदूर सभा महाराष्ट्र कौन्सिलचे अध्यक्ष साथी निवृत्ती धुमाळ यांनी दिली. निवृत्ती धुमाळ पुढे म्हणाले की, राज्यातील शासकीय धान्य गोदामामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये जवळजवळ १० ते ११ हजार नोंदीत माथाडी कामगार काम करीत आहेत. या कामगारांना माथाडी कायदा लागू आहे. राज्य शासनाच्या अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने २४ एप्रिल २०२६ रोजी एक शासन निर्णय जाहीर केला असून, या शासन निर्णयाप्रमाणे शासनाने धान्य वितरणासाठी द्वारपोच योजना प्रणाली लागू केली आहे. यामुळे आता शासकीय धान्य गोदामामध्ये काम करत असणाऱ्या कामगारांना कामच मिळणार नाही. तसेच वाहतुकीच्या ट्रकवर उपलब्ध असणारे काम या शासकीय धान्य गोदामातील कामगारांना न देता त्या ठिकाणी वाहतूक ठेकेदारांना त्यांचे स्वतःचे कंत्राटी कामगार लावण्याची परवानगी या शासन निर्णयात देण्यात आलेली आहे. त्यामुळे राज्यातील १० ते ११ हजार कामगारांचा रोजगार जाणार आहे. त्यामुळे या कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना उपासमारीला तोंड द्यावे लागेल. खरे तर शासन निर्णयाद्वारे कायद्याला हरताळ फासण्याची शासनाची कृती असून ठेकेदारांना बाहेरचे कामगार स्वस्तात लावण्याची परवानगी देणारे आहे. या बाबतीमध्ये कृती समिती आणि वेगवेगळ्या माथाडी कामगार संघटनांनी मा. कामगार मंत्री आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना निवेदन देऊन कामगारांच्या व्यथा त्यांच्या समोर मांडलेल्या आहेत. मात्र अन्न नागरी पुरवठा मंत्री त्यांच्या कार्य भावल्याचे निमित्त करून या विषया संबंधित लावलेल्या मिटिंग सातत्याने पुढे ढकलत आहेत. त्यामुळे माथाडी कामगार त्यांच्या संघटना आणि माथाडी कृती समिती यांनी २५ व २६ मे रोजी राज्यव्यापी धरणे कार्यक्रम जाहीर केला आहे.

याबाबतीत लवकरात लवकर तोडगा निघाला नाही आणि कार्यरत असणाऱ्या तालुका गोडाऊनमधील माथाडी कामगारांचे वेतन व काम सुरक्षित केले गेले नाही तर बेमुदत संप आणि तीव्र आंदोलन करण्याचा निर्धार कृती समितीच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे. आंदोलनाच्या बाबतीत पुढील निर्णय घेण्यासाठी माथाडी कामगारांचे नेते व माथाडी कृती समितीचे अध्यक्ष मा. नरेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २६ मे २०२६ रोजी ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियन कार्यालय, पी.डिमेलोभवन, कर्नाक बंदर, मुंबई येथे सर्व माथाडी कामगार नेत्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती निवृत्ती धुमाळ यांनी दिली.

---

## देगलूर तालुक्यातून प्रथम जिल्हाधिकारी होण्याचा मान

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे** : देगलूर(दि.२५) देगलूर तालुक्यातील रामपूर येथील सुपुत्र तथा २०१६ च्या यूपीएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणारे राहुल तुकाराम पांडवे यांची कर्नाटक राज्यातील यादगीर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती झाली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे.देगलूर तालुक्यातून प्रथमच एखादी व्यक्ती जिल्हाधिकारी पदापर्यंत पोहोचल्याने तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.त्यांच्या निवडीमुळे संपूर्ण तालुक्यात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राहुल पांडवे यांचे वडील डॉ.तुकाराम पांडवे हे आरोग्य विभागात जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत होते. वडिलांच्या नोकरीतील सततच्या बदल्यांमुळे राहुल पांडवे यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण राज्यातील विविध शहरांमध्ये झाले.शिक्षणाच्या या प्रवासात त्यांनी सातत्य,जिद्द आणि अभ्यासू वृत्ती कायम ठेवली.उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुणे गाठले.पुण्यातील नामांकित फर्ग्युसन कॉलेज मधून बीएससी पदवी प्राप्त केली.

त्यानंतर त्यांनी केंद्रीय लोकसेवा




आयोगाच्या (UPSC) परीक्षेची तयारी सुरू केली. कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर २०१६ च्या यूपीएससी परीक्षेत त्यांनी राज्यात पाचवा तर देशात २०० वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.यूपीएससीत यश मिळाल्यानंतर कर्नाटक राज्यात हरपनहळ्ळी येथे उपजिल्हाधिकारी म्हणून त्यांची पहिली नियुक्ती झाली.त्यानंतर त्यांनी शिमोगा येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली.प्रशासकीय कामकाजातील कार्यक्षमता, शिस्तप्रियता आणि लोकाभिमुख दृष्टीकोनामुळे त्यांनी अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण केली.कोविडच्या कठीण काळात त्यांनी गुलबर्गा महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून अत्यंत प्रभावीपणे काम पाहिले.संकट काळात नागरिकांना आवश्यक सेवा उपलब्ध करून देताना त्यांनी उत्कृष्ट प्रशासनाचे दर्शन घडवले. याशिवाय त्यांनी विद्युत विभागात विभागीय व्यवस्थापकीय संचालक (एमडी) म्हणूनही जबाबदारी सांभाळली.

रायचूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय काम केले.सध्या ते गुलबर्गा विभागात शालेय शिक्षण विभागाचे अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत होते. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाची आणि कार्यक्षमतेची दखल घेत कर्नाटक शासनाने त्यांची यादगीर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती केली आहे.त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला असून कर्नाटकात त्यांची शिस्तप्रिय, अभ्यासू आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख निर्माण झाली आहे.त्यांनी कठोर परिश्रम, अभ्यास आणि जिद्दीच्या बळावर जिल्हाधिकारी पदापर्यंत मजल मारल्याने तालुक्यातील तरुणांसमोर प्रेरणादायी आदर्श उभा राहिला आहे.राहुल पांडवे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून रामपूरसह संपूर्ण देगलूर तालुक्यात आनंदोत्सवाचे वातावरण आहे.

## तडपत्या उन्हात पेट्रोल पंपांवर सावली गायब; ग्राहकांचे प्रचंड हाल !!

**दैनिक युवक आधार**

**आकोट दिलीप कराळे प्रतिनिधी:** गेल्या काही दिवसांपासून राज्यामध्ये उन्हाचा पारा पंचेचाळीस अंशाच्या पार गेला आहे. नागरिक घामाघूम झाले असून उन्हाच्या तीव्र झळा बसत आहेत. अशा या कडकडत्या उन्हात दुचाकी आणि चारचाकी वाहनांमध्ये इंधन भरण्यासाठी पेट्रोल पंपावर जाणाऱ्या नागरिकांना एका वेगळ्याच त्रासाला सामोरे जावे लागत आहे. बहुतेक पेट्रोल पंपांवर ग्राहकांसाठी सावलीची कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

पेट्रोल,डिझेल भरण्यासाठी रांगेत उभे राहताना नागरिक घामाघूम होत आहेत.

शहरातील तसेच महामार्गावरील अनेक पेट्रोल पंपांवर केवळ मुख्य इंधन मशिनच्या वरच शेड (छप्पर) उभारण्यात आलेले आहे. मात्र, पेट्रोल भरण्यासाठी लागणाऱ्या लांबच लांब रांगा थेट उन्हात येतात. दुचाकी चालकांना भर उन्हात १० ते १५ मिनिटे रांगेत उभे राहावे लागत आहे.



उन्हामुळे लहान मुले आणि वृद्धांचे हाल होत आहे दुचाकीवर मागे बसलेली लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिकांना गाडी पंपावर उभी करेपर्यंत शेडच्या बाहेर, थेट उन्हात ताटकळत राहावे लागत आहे.

अश्यातच कडक उन्हामुळे दुचाकींचे सीट तापल्याने त्रास होते .उन्हात गाड्या उभ्या राहिल्याने सीट इतक्या प्रचंड तापतात की त्यावर बसणेही कठीण होते.

नियमानूसार प्रत्येक पेट्रोल पंपावर ग्राहकांसाठी मोफत आणि थंड पिण्याच्या पाण्याची, तसेच स्वच्छ स्वच्छतागृहाची व्यवस्था असणे बंधनकारक आहे.

सर्वच पेट्रोल पंप चालक या नियमाचे

> **"पेट्रोलचे,डिझेल चे दर आधीच गगनाला भिडले आहेत. आम्ही पैसे देऊन इंधन खरेदी करतो, मग पंपांवर किमान सावली आणि मूलभूत सुविधा याची सोय का नसावी?**
> **प्रशासनाने यावर कडक कारवाई केली पाहिजे."**
>
> **— दुचाकी चालक**

काटेकोर पालन करतातच हा एक प्रश्नच आहे .

पेट्रोल पंप चालकांकडून दरमहा लाखो रुपयांची उलाढाल केली जाते, मात्र ग्राहकांच्या सुविधेच्या नावावर अनेक ठिकाणी आनंदी आनंदच आहे. उन्हाळ्याचे आणखी काही दिवस बाकी असल्याने, संबंधित कंपन्यांनी आणि प्रशासनाने तातडीने सर्व पेट्रोल पंपांचे ऑडिट करावे आणि ज्या पंपांवर सावली व इतर व्यवस्था नाही, त्यांना दंड ठोठावावा, अशी मागणी आता सर्वसामान्य जनतेतून जोर धरू लागली आहे.

---

## 'चीता' हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त; तिन्ही अधिकारी बचावले

**नवी दिल्ली** : लडाखमधील दुर्गम तांगस्ते डोंगराळ भागात भारतीय सैन्याचे 'चीता' हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुदैवाने, या अपघातातून हेलिकॉप्टरमधील तिन्ही अधिकाऱ्यांनी चमत्कारिकरीत्या जीव वाचवला आहे.

बुधवारी घडलेली ही घटना शुक्रवारी रात्री उशिरा समोर आली. हे एक इंजिन असलेले 'एचएएल चीता' हेलिकॉप्टर एक लेफ्टनंट कर्नल आणि एक मेजर चालवत होते. तर ३ इन्फंट्री डिव्हिजनचे कमांडर मेजर जनरल हे प्रवासी म्हणून यात स्वार होते. लडाखच्या अत्यंत उंचावरील आणि खडतर भागातून उड्डाण करत असताना हा अपघात झाला. या अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नसून, लष्कराकडून या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

### ताफ्याचा सुरक्षेचा प्रश्न

फ्रेंच अलौएट ३ वर आधारित असलेले 'चीता' हेलिकॉप्टर भारतीय सैन्यासाठी, विशेषतः सियाचीन हिमनदीसारख्या अत्यंत उंचावरील आणि संवेदनशील भागात दीर्घकाळापासून महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत या विमानांच्या सुरक्षेबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या दशकात १५ हून अधिक चीता आणि चेतक हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाले



असून यामध्ये अनेक वैमानिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

### आधुनिकीकरण आराखडा

या वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याने आपल्या 'आर्मी एव्हिएशन कॉर्न्स'च्या आधुनिकीकरणाची वेगाने तयारी सुरू केली आहे. पुढील एक ते दोन वर्षांत जुनी झालेली चीता आणि चेतक हेलिकॉप्टर टप्प्याटप्प्याने सेवेतून बाद करण्यात येतील. त्यांच्या जागी पुढील ८ ते १० वर्षांत नव्या पिढीची 'लाइट युटिलिटी हेलिकॉप्टर्स' समाविष्ट केली जाणार आहेत.

लष्कराला सध्या अशा २५० नवीन हेलिकॉप्टर्सची आवश्यकता आहे. यासाठी स्वदेशी बनावटीच्या हेलिकॉप्टर्सची खरेदी आणि तात्पुरत्या स्वरूपातील भाडेतत्वावरील पर्याय अशा दोन्ही मार्गाचा अवलंब केला जात आहे. यामध्ये 'हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड'ची भूमिका महत्त्वाची असेल. सैन्याने आधीच ६ मर्यादित-श्रेणीतील 'एलयूएच' हेलिकॉप्टर्सची ऑर्डर दिली आहे. हे नवीन हेलिकॉप्टर ताशी २२० किमी वेगाने उडू शकते आणि ६.५ किमी उंचीपर्यंत सहज झेप घेऊ शकते.

## युवा मोर्चा पदाधिकारी मयूर वांदे यांच्या निवासी खा. डॉ. अनिल बोंडे यांची सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : भारतीय जनता पार्टीचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी शनिवारी भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी मयूर बबनरावजी वांदे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीत पक्ष संघटन, बूथ मजबुतीकरण आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर युवा कार्यकर्त्यांच्या जबाबदारीवर सविस्तर चर्चा झाली.

यावेळी डॉ. बोंडे म्हणाले, "युवा मोर्चा हा भाजपाचा कणा आहे. मयूर वांदे यांच्यासारखे निष्ठावान व सक्रिय कार्यकर्ते पक्षाला गावागावात पोहोचवत आहेत. ग्रामीण भागातील युवकांना पक्षाशी जोडण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने प्रयत्न करावेत.वांदे कुटुंबीयांनी डॉ. बोंडे यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. बैठकीत स्थानिक प्रश्न, शेतकरी समस्या व सामाजिक उपक्रमांबाबतही विचारमंथन झाले. युवा मोर्चाच्या



वतीने लवकरच सदस्य नोंदणी मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

ज्येष्ठ नेते बाळासाहेब हिंगणीकर, मदनराव बायस्कर, सलीमभाई घाणीवाले, गोकुळकाका भडांगे, प्रल्हादराव वांदे, योगेशभाऊ वांदे, नरेंद्र वांदे, निलेश भाऊ वांदे, पंकज भाऊ वांदे, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे मेळघाट जिल्हाध्यक्ष नकुल भाऊ सोनटक्के, पत्रकार शुभम बायस्कर, प्रेम आसरे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# निर्मल नगरीच्या मंदिरात चौथ्या वर्षी आंब्याचा रस, सरगुंडे व शेवळ्या महाप्रसादात !

■ शेगांवची भक्तीगंगा निर्मल नगरीच्या मंदिरात पुरुषोत्तम मास महाप्रसाद महापरायणाचे आयोजन संपन्न

■ निर्मल नगरीच्या मंदिरात भक्तांची प्रचंड गर्दी, जणू काही शेगावच अवतरले !

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट च्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या ३५ वे, सामूहिक महापारायणाप्रसंगी उमरेड मार्गावरील निर्मल नगरीच्या मंदिरात, श्री गजानन विजय ग्रंथाचे महापारायण रविवारी 24 मे 2026 रोजी, अतिशय सुंदर, आनंदात पार पडले. रविवारच्या सकाळी ६ ते ११ या दरम्यान, १ ते २० व्या, अध्यायाचे पठण, त्यानंतर ११:३० वा. २१ व्या, अध्यायाचे सामूहिक पठण व आरती, नंतर दुपारी १२ वाजतापासून महाप्रसादाला प्रारंभ झाला. निर्मल नगरीच्या मंदिरात सकाळ पासूनच भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. मंदिरात शिस्तीप्रमाणे नियमांचे पालन करून त्याप्रसंगी महाप्रसादाची किमयाच झाली ! बघा कशी.. प्रत्येक भक्तांच्या थालीमध्ये आंब्याचा रस, शेवड्या, सरगुंडे, पोळया, भजे, वांग्याची भाजी, झुनका-भाकरी आणि मसाला भात हे महाप्रसादात देण्यात आले. आणि भक्तांनी आनंदाने आस्वाद घेतला. श्री गजानन महाराजांची किमया बघा, किती



सुंदर जेवण मिळालं, भक्तांचे मन प्रसन्न झाले ! यामध्येच तर खरं भक्तांचे प्रेम दिसून आले. उलट असं वाटतं होत की, आपण शेगाव सारखेच जेवण केले. याप्रसंगी नागपूरातील 46 ते 47 डीग्री सेल्सिअस तापमाना दरम्यान मंदिरात चपचप घामाने भिजलेल्या भक्तगणांनी प्रचंड गर्दी केली होती. जणू काही शेगावच अवतरले असे यावेळेस दिसून आले. मंदिरात गजानन महाराजांचा जयजयकार, गण गण गणात बोते या मंत्राचा गजर ही गजर होता. यावेळी हजारोच्या संख्येने भक्तांनी महाप्रसादाचा अप्रतिम आस्वाद घेतला. या सर्वांच्या मागे आयोजकांनी अथक परिश्रम घेतलेत. कारण यांच्या प्रयत्नामुळे भक्तगण एकत्रित आलेले आहे. आणि महाप्रसादात आंब्याचा रस मिळाला हे विशेष :

# वाशिमात 'उबाठा'ला महास्फोटक धक्का!

■ जिल्हाप्रमुख सुरेश मापारींसह शेकडो पदाधिकारी भाजपच्या गळाला

■ मुंबईत रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भव्य पक्षप्रवेश

■ आगामी निवडणुकांपूर्वी ठाकरे गट हादरला

■ वाशिमच्या राजकारणात मोठ्या उलथापालथीचे संकेत

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यातील राजकारणात रविवारी मोठा राजकीय भूकंप झाला असून उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटाला आतापर्यंतचा सर्वात मोठा धक्का बसला आहे. ठाकरे गटाचे वाशिम जिल्हाप्रमुख सुरेश मापारी यांनी आपल्या शेकडो कट्टर समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करत 'उबाठा'ला मोठे खिंडार पाडले आहे. मुंबईत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भव्य पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा हा प्रवेश केवळ एका जिल्हाप्रमुखापुरता मर्यादित नसून, ठाकरे गटातील अनेक प्रभावशाली आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक, बाजार समिती संचालक, जिल्हा परिषद सदस्य आणि युवा सेनेचे पदाधिकारी यांनीही भाजपमध्ये प्रवेश करून जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून काढले आहे.'कमळ' हाती घेताच जिल्ह्यात चर्चेला उधाण

गेल्या काही दिवसांपासून वाशिम जिल्ह्यातील ठाकरे गटात मोठी अस्वस्थता असल्याची चर्चा होती. अखेर त्या चर्चांना पूर्णविराम देत सुरेश मापारी यांनी भाजपमध्ये प्रवेश करून सर्वांना राजकीय धक्का दिला. "भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रवादी विचार, विकासाभिमुख धोरणे आणि राज्यातील



नेतृत्वावर विश्वास ठेवून आम्ही भाजपमध्ये प्रवेश करीत आहोत," अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

विशेष म्हणजे, सुरेश मापारी हे ठाकरे गटाचे जिल्ह्यातील अत्यंत प्रभावी आणि संघटनात्मक ताकद असलेले नेते मानले जात होते. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत त्यांचे मजबूत जाळे होते. त्यामुळे त्यांच्या जाण्याने ठाकरे गटाची संघटनात्मक ताकद मोठ्या प्रमाणात कमकुवत झाल्याची चर्चा आता जिल्हाभर रंगू लागली आहे.

**कोण-कोण झाले भाजपमय?**

या भव्य पक्षप्रवेशात युवा सेना शहरप्रमुख आशीष इंगोले, माजी नगरसेवक अनंताभाऊ रंगभाळ, नामदेव हजारे, राजूभाऊ घोडीवाले, हेमलतताताई इंगळे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विनोद पट्टेबहादूर, माजी जिल्हा परिषद सदस्य मीनाक्षीताई पट्टेबहादूर, अकोला जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक धनंजय गोरे, वाशिम बाजार समितीचे नंदकिशोर भोयर, हिराभाई जाणीवाले, माजी पंचायत समिती सभापती तुकाराम काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवदास पाटील राऊत, सुरेश कऱ्हे, सचिन डोफेकर, संदीप चिखलकर यांच्यासह तब्बल २०० हून अधिक पदाधिकाऱ्यांनी भाजपचा झेंडा खांद्यावर घेतला.

या सर्व नेत्यांच्या प्रवेशामुळे भाजपची वाशिम जिल्ह्यातील ताकद आणखी वाढल्याचे मानले जात आहे. विशेषतः ग्रामीण भागातील राजकीय समीकरणांवर या प्रवेशाचा मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**मुंबईत जल्लोषात स्वागत**

मुंबईत पार पडलेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यात भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्व नवप्रवेशी पदाधिकाऱ्यांचे भाजपचा स्कार्फ घालून स्वागत केले. यावेळी वाशिमचे भाजप आमदार श्याम खोडे तसेच भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

कार्यकर्त्यांनी "भारतीय जनता पार्टीचा विजय असो", "मोदी-शिंदे-फडणवीस" यांच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. या सोहळ्यानंतर भाजप कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

**'उबाठा'ची जिल्ह्यातील पकड सैल?**

सुरेश मापारी हे ठाकरे गटाचे वाशिम जिल्ह्यातील प्रमुख चेहरा होते. अनेक निवडणुकांमध्ये त्यांनी संघटना उभी करत पक्षाला ताकद दिली होती. मात्र आता त्यांच्यासह मोठ्या प्रमाणावर पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे ठाकरे गटाची जिल्ह्यातील पकड सैल झाल्याचे बोलले जात आहे.

विशेषतः आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, बाजार समित्या आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश अत्यंत निर्णायक मानला जात आहे. भाजपने जिल्ह्यात मोठी राजकीय खेळी करत ठाकरे गटाला जबर धक्का दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.आगामी निवडणुकांत बदलणार समीकरणे?वाशिम जिल्ह्यातील या मोठ्या राजकीय घडामोडीनंतर आगामी निवडणुकांचे गणित पूर्णपणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भाजपला ग्रामीण भागात अधिक बळ मिळणार असून ठाकरे गटासमोर संघटना टिकविण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.राजकीय वर्तुळात आता एकच चर्चा सुरू आहे "वाशिममध्ये ठाकरे गटाला बसलेला हा धक्का केवळ सुरुवात आहे का?"

# धनादेश अनादर प्रकरणी आरोपीस ४ महिने साध्या कैदेची शिक्षा ; सेलू न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**दैनिक युवक आधार**

**सेलू /प्रतिनिधी** : धनादेश अनादर प्रकरणात सेलू न्यायालयाने आरोपीस चार महिने साध्या कैदेची शिक्षा सुनावत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. ही कारवाई एससीसी क्र. १७८/२०१३ या प्रकरणात करण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी अशोक नारायणराव ढगे यांनी नातेवाईक आजारी असल्याने त्यांच्या उपचारासाठी आरोपी भगीरथ नारायण गायकवाड यांना एक लाख रुपये हातउसने दिले होते. संबंधित रक्कम परत मागितल्यानंतर आरोपीने फिर्यादीस एक लाख रुपयांचा धनादेश दिला होता. मात्र, संबंधित धनादेश बँकेत जमा केल्यानंतर खात्यात अपुरी रक्कम असल्याने तो वटला नाही.यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी अशोक ढगे यांनी धनादेश परतावा अधिनियमांतर्गत न्यायालयात दावा दाखल केला. प्रकरणातील साक्षीपुरावे व कागदपत्रांचा विचार करून प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, सेलू येथील न्यायाधीश मा. जी. ए. तारळ यांनी आरोपी भगीरथ नारायण गायकवाड यास कलम १३८ एन.आय. ॲक्ट अंतर्गत दोषी ठरविले.न्यायालयाने आरोपीस चार महिने साध्या कैदेची शिक्षा सुनावली असून फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून एक लाख रुपये ३० दिवसांच्या आत देण्याचे आदेश दिले आहेत. अन्यथा अतिरिक्त दोन महिने साध्या कैदेची शिक्षा भोगावी लागेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले या प्रकरणात फिर्यादी अशोक नारायणराव ढगे यांच्या वतीने ॲड प्रभाकर गिराम यांनी काम पाहिले.

# बोगस रस्ता कामांचे मस्टर तत्काळ बंद करून गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांचे मस्टर तात्काळ काढण्यात यावे – मनसेचे कैलास दरेकर यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :-मारुती सत्रे** : बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघात गरीब घरकुल लाभार्थ्यांच्या हक्काचे मस्टर (रोजगार हमी योजनेचे मस्टर) काढण्याऐवजी, कोट्यवधी रुपयांच्या बोगस रस्त्यांची कामे दाखवून त्यांचे मस्टर काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक पातळीवर महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केला आहे.या प्रकरणातील वस्तुस्थिती घरकुल मस्टरकडे दुर्लक्ष: पंतप्रधान आवास योजना किंवा राज्य सरकारच्या इतर घरकुल योजनांतर्गत गोरगरीब लाभार्थ्यांना स्वतःचे हक्काचे घर बांधण्यासाठी मनरेगा (MGNREGA) अंतर्गत मस्टर काढून मजुरी मिळणे आवश्यक असते. मात्र, प्रशासनाकडून यामध्ये दिरंगाई केली जात असल्याची लाभार्थ्यांची तक्रार आहे.बोगस रस्त्यांचा घाट: प्रत्यक्षात अनेक मस्टर वर एकाच मजूरा फोटो दाखवून अस्तित्वात नसलेल्या किंवा केवळ कागदावर दाखवलेल्या कोट्यवधी रुपयांच्या रस्ते कामांचे मस्टर घाईघाईने काढून सरकारी निधी लाटण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप केला जात आहे.भ्रष्टाचाराचा संशय: स्थानिक रोजगार सेवक शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा 'बोगस रस्त्यांचा घाट' घातला जात असून, यामुळे खऱ्या मजुरांना आणि घरकुल लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या निधीपासून वंचित राहावे लागत असल्याचे बोलले जात आहे. आष्टी , पाटोदा व शिरूर तालुक्यातील रस्ता कामांवर प्रशासकीय कारवाईची मागणी केली आहे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करून आणि गरीब घरकुल लाभार्थ्यांचे थकीत मस्टर तात्काळ मंजूर करावेत, अशी मागणी मनसेचे कैलास दरेकर यांनी जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# नागपूर स्थानिक प्राधिकरण मतदार संघासाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : महाराष्ट्र विधान परिषद पोट निवडणूक २०२६ अंतर्गत नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या व मतदान केंद्रांची यादी आज दिनांक २२ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी सर्व पदनिर्देशित ठिकाणी तसेच मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रेस नोटमध्ये देण्यात आली आहे.प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगर पालिका, नगर परिषद तसेच तहसील कार्यालय येथे संबंधित प्रारूप मतदार याद्या पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. मतदार यादीमध्ये नाव, तपशील किंवा मतदान केंद्राबाबत कोणतीही हरकती अथवा दावे असल्यास संबंधितांनी निर्धारित नमुन्यात अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.हरकती व दावे सादर करण्यासाठी २८ मे २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली असून, संबंधित अर्ज कार्यालयीन वेळेत मतदार नोंदणी अधिकारी, स्थानिक प्राधिकारी मतदार संघ तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे स्वीकारले जाणार आहेत.प्रशासनाने ही प्रारूप मतदार यादी व मतदान केंद्रांची माहिती नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध करून दिली आहे. नागरिकांनी वेळेत यादी तपासून आवश्यक त्या हरकती अथवा दुरुस्त्या सादर कराव्यात, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

# उत्पादन आणि लॉजिस्टिक्सच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## गौंडखैरी येथे गोदाम लॉजिस्टिक्स पार्कचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**नागपूर प्रतिनिधी राकेश यादव** : सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता उत्पादन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात अनेक मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. मात्र, ज्या वेळी संधी उपलब्ध होतात, त्याच वेळी नवीन आव्हानेही समोर उभी राहतात. लॉजिस्टीक्सवर होणारा खर्च हेच सध्या उत्पादन क्षेत्रापुढील सर्वात मोठे आव्हान असून जागतिक पुरवठा साखळीचा प्रभावी भाग बनायचे असेल, तर आपल्याला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

गोदाम लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने गोंडखैरी येथे उभारण्यात आलेल्या गोदाम लॉजिस्टिक्स पार्कच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासह आमदार डॉ. आशिष देशमुख, परिणय फुके, गोदाम लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक महावीर जैन, के. के. गुप्ता, राजन अग्रवाल, जयप्रकाश गुप्ता, कृष्णकुमार गुप्ता, हल्दीरामचे शिवकिसन अग्रवाल आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, नागपूर व गडचिरोली भागातही आता उद्योग मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. त्यामुळे लॉजिस्टीक्सच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होणार आहेत. सध्याची स्थिती पाहता आणखी कितीतरी प्रमाणात लॉजिस्टीक्सच्या व्यवस्थेत वाढ होण्यास वाव दिसत आहे. या क्षेत्रामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून गोदाम लॉजिस्टिक्स पार्क हा नागपूरच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

ईलेक्ट्रिक वाहनामुळे लॉजिस्टिक्सवरील खर्च कमी होईल - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

मालवाहतुकीत ईलेक्ट्रिक वाहनांचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्यास इंधन खर्चात बचतीसह पर्यावरणालाही मदत होईल आणि पर्यायाने लॉजिस्टिक्सवर होणारा खर्चही कमी करता येईल, असा विश्वास केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

संचालक महावीर जैन यांनी आपल्या प्रस्ताविकात गोदाम लॉजिस्टिक्स पार्कबाबत माहिती दिली. राजन अग्रवाल यांनी आभार मानले.

**असा आहे हा पार्क**




दरम्यान, मध्य भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक औद्योगिक लॉजिस्टिक्स पार्कपैकी एक असा हा पार्क तब्बल २५ लाख चौरस फुटाच्या दर्जेदार 'वर्ग अ' गोदाम क्षमतेसह सुमारे १०५ एकर जागेत उभारण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे (एआय) संचालित स्मार्ट वेअर हाऊसिंगची अत्याधुनिक सुविधा या प्रकल्पात समाविष्ट आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रूपात सुमारे १५ हजार रोजगारांची निर्मिती होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ आणि समृद्धी महामार्गाशी धोरणात्मकदृष्ट्या जोडण्यात आलेला असा हा महत्त्वाचा लॉजिस्टिक प्रकल्प आहे. या प्रकल्पात सुमारे सहाशे कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून प्रकल्पात सौर उर्जा संयंत्राचा समावेश करण्यात आला आहे.

# नगरसोल ते कामारेड्डी जाणाऱ्या वृद्ध महिलेचे सोन्याचे 2.4 तोळ्याचे मंगळसूत्र उमरी रेल्वे स्टेशन येथे लंपास रेल्वे पोलिसांचा विशेष तपास चालू

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : नगरसोल येथून कामारेड्डी जाण्यासाठी वृद्ध महिला आपल्या परिवारातील 5 ते 6 जनान साहित अजंठा एक्सप्रेस गाडी संख्या 17063 च्या कोच क्र S4 व S5 मधून कामारेड्डी साठी प्रवास करत असतांना दि 24 मे 2026 रविवार रोजी पहाटे 4 च्या सुमारास कोच क्र S4 मधून अज्ञात व्यक्तीने



वृद्ध महिलेचे सोन्याचे 2.4 तोळ्याचे मंगळसूत्र उमरी रेल्वे स्टेशन येथे लंपास केले असता आरडा ओरडा केल्यास पहाटे अंधाराचा फायदा घेत अज्ञात आरोपी प्रसार झाला. वृद्ध महिला परिवाराच्या वतीने निजामाबाद आरपीएफ यांच्या कडे सोन्याचे मंगळसूत्र चोरीला गेल्याचे तक्रार करत फआयआर दाखल करण्यात आला.

सोन्याचे मंगळसूत्र चोरीला गेल्याचे तक्रार दाखल होताच रेल्वे पोलिसाच्या वतीने तपासाची चक्रे जलद गतीने फिरवत उमरी रेल्वे स्टेशन येथे तपास करण्यात आला. या वेळी उपस्थित रेल्वे आरपीएफ क्राईम ब्रँच पोलीस निरीक्षक बी.सैदय्या , रेल्वे पोलीस निरीक्षक निजामाबाद बी.व्ही. सुबारेड्डी , रेल्वे सहाय्यक पोलीस निरीक्षक धर्माबाद रामाशेष कुमार , डॉगस्कॉड श्वानपथक प्रमुख नरेश सिंग व रेल्वे पोलिस फोज फाटा या वेळी उपस्थित होता.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नोकरी नव्हे, पवित्र समाजसेवा जयश्री आघव आणि शुभांगी बांगर यांच्या निस्वार्थ सेवेने खोकरमोहा अंगणवाडीचे रूप पालटले

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : एका लहान मुलाचे पाऊल जेव्हा पहिल्यांदा घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडते, तेव्हा त्याच्या मनात अनोळखी जगाची भीती आणि डोळ्यात अश्रू असतात. पण खोकरमोहा येथील अंगणवाडी क्रमांक १ मध्ये प्रवेश करताना आज हे चित्र पूर्णपणे बदललेले दिसते. येथे प्रवेश करताच लहानग्यांचा रडण्याचा आवाज नाही, तर त्यांच्या हसण्याचा आणि गाण्यांचा किलबिलाट ऐकायला येतो. या अंगणवाडीत पाऊल ठेवताच एका माउलीची माया मुलांना मिळते, जी त्यांचे अश्रू पुसून त्यांना खेळणी आणि अक्षरांच्या जगात रमवून घेते. ही कौतुकास्पद किमया खोकरमोहा येथील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनी आपल्या अहोरात्र परिश्रमांतून करून दाखवली आहे. या दोन महिलांच्या भक्कम प्रयत्नांमुळे घडतेय नवी पिढी (विशेष हायलाईट)अंगणवाडीच्या या यशस्वी वाटचालीच्या मुख्य शिलेदार अंगणवाडी सेविका श्रीमती जयश्री रामकृष्ण आघव आणि मदतनीस श्रीमती शुभांगी महारुद्र बांगर (गर्जे) या आहेत. या दोघींनी आपल्या निस्वार्थ सेवाभावातून आणि अविरत कष्टांतून समाजात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. 'अंगणवाडी' हे केवळ शासकीय नोकरीचे किंवा उपजीविकेचे साधन नसून, ती देशाची भावी पिढी आणि समाज घडवण्याची एक अत्यंत पवित्र जबाबदारी आहे, हे या दोघींनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे.



त्यांच्या याच प्रामाणिक वृत्तीमुळे आज खोकरमोहा अंगणवाडी क्रमांक १ चा संपूर्ण जिल्ह्यात नावलौकिक होत आहे. बालकांचा अंगणवाडीकडे ओढा वाढला आहे. 'खेळत-खेळत' संस्कारांची शिदोरी श्रीमती जयश्री आघव आणि श्रीमती शुभांगी बांगर यांनी बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, बालमनावर योग्य वयात चांगले संस्कार व्हावेत या साठी त्या विशेष प्रयत्न करतात. अंगणवाडीत येणाऱ्या मुलांना खेळता-खेळता अक्षरांची ओळख करून देणे, विविध रंग, संख्यांची माहिती देणे आणि त्यांच्यात चांगल्या सवयी रुजवणे या कडे त्यांचा मुख्य भर असतो. खेळकर आणि आनंदी वातावरणामुळे गावातील लहान मुलांचा अंगणवाडीकडे येण्याचा ओढा प्रचंड वाढला असून, पालकांचाही अंगणवाडीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. शिक्षणाची ही पहिली पायरी या मुलांसाठी एक आनंददायी आणि संस्मरणीय प्रवास ठरत आहे. कुपोषणाविरुद्ध लढा आणि आरोग्याची भक्कम ढालगावातील मुलांच्या उत्तम आरोग्याची ढाल बनून या दोघी नेहमीच तत्पर असतात. बालकांना वेळेवर आणि नियमितपणे पौष्टिक आहार मिळवून देणे, त्यांच्या वाढीवर लक्ष ठेवण्यासाठी दरमहा त्यांचे वजन आणि उंचीची अचूक मोजणी करणे यात त्या कधी ही कसूर करत नाहीत. गावातून कुपोषण पूर्णपणे हद्दपार करणे हेच त्यांचे मुख्य ध्येय आहे. शासनाच्या विविध लसीकरण मोहिमा यशस्वी करणे असो, वा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विभागाशी योग्य समन्वय साधणे असो, यांचे नियोजन नेहमीच अत्यंत चोख आणि वेळेवर असते. गरोदर व स्तनदा मातांना मोलाचे मार्गदर्शनया दोघींचे कार्य केवळ अंगणवाडीतील मुलांपुरतेच मर्यादित राहिलेले नाही, तर त्यांनी गावातील प्रत्येक कुटुंबाशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले आहे. गावातील गरोदर महिला आणि स्तनदा मातांची त्या वेळोवेळी भेट घेतात. त्यांना आरोग्याची काळजी कशी घ्यावी, वैयक्तिक स्वच्छता का महत्त्वाची आहे आणि नवजात बालकांसाठी योग्य पोषण आहार कसा असावा, याचे अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत मार्गदर्शन करतात. मातांच्या आरोग्याविषयी घेतलेली ही काळजी संपूर्ण गावासाठी वरदान ठरत आहे. ग्रामस्थ आणि प्रशासनाकडून कौतुकाचा वर्षाव श्रीमती जयश्री रामकृष्ण आघव आणि श्रीमती शुभांगी महारुद्र बांगर यांच्या या उल्लेखनीय, प्रामाणिक आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल आता सर्व स्तरांतून घेतली जात आहे. त्यांच्या या सेवाभावी वृत्तीमुळे खोकरमोहा अंगणवाडी क्रमांक १ चा हा 'आदर्श पॅटर्न' इतर सर्व अंगणवाड्यांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण खोकरमोहा ग्रामस्थ, पंचक्रोशीतील नागरिक आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून त्यांच्या वर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## एफडीएची 'सिंघम' एंट्री; गुटखा—अवैध अन्न व्यापारावर रायगड व अलिबाग तालुक्यात मोठी कारवाई ?

### तुकाराम मुंढे यांच्या कठोर पावलांमुळे अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : राज्यातील गुटखा व अन्न भेसळीच्या अवैध कार्यांवर कारवाई करण्यासाठी शासनाने अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागात तुकाराम मुंढे यांची आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या आगमनानंतर अवैध गुटखा माफिया, बनावट औषध विक्रेते आणि नियमभंग करणाऱ्या खाद्यव्यवसायांवर धडक कारवाई सुरू झाली आहे.

मुंढे हे कठोर शिस्तप्रिय व धडाकेबाज अधिकारी म्हणून ओळखले जातात. पोलीस आणि स्थानिक एफडीए टीमच्या सहकार्याने गेल्या काही दिवसांत करण्यात आलेल्या मोहीमेअंतर्गत:

अनेक गुटखा उत्पादन आणि पॅकेजिंग युनिटवर छापे; मोठ्या प्रमाणात गुटखा खेप, पॅकिंग साहित्य आणि विक्रीसाठी तयार माल जप्त.परवाना नसलेली किंवा नियमनाचे उल्लंघन करणारी दुकाने आणि उत्पादन केंद्रे सील; दोषींवर परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची कारवाई.बनावट औषधे विकणाऱ्या आणि अन्नात भेसळ करणाऱ्या व्यवसायांविरुद्ध गुन्हे दाखल करून जप्ती व




चौकशी.

खाद्यसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणारी हॉटेलं आणि छोटे खाद्यप्रक्रिया केंद्र सील; दंड आणि बंदीचा आदेश.

तुकाराम मुंढे म्हणाले, "जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना आणि नियमांवर बोट ठेवणाऱ्यांना मी सहन करणार नाही. जे नियम मोडतील, त्यांच्यावर काटकारू कारवाई होईल."

त्यांच्या कठोर पद्धतीमुळे स्थानिक व्यापार आणि पुरवठा साखळीवर मोठा परिणाम झाला आहे.

स्थानिक नागरिक आणि व्यापारी यांचे प्रतिसाद मिश्रित आहेत. अनेक ग्राहकांनी कारवाईचे स्वागत केले आणि म्हटले की बाजारातील बनावट व अप्रमाणित खाद्यपदार्थ कमी होतील. काही लहान व्यापारी आणि स्टॉलधारकांनी प्रशासनाकडून मार्गदर्शन व परवाना प्रक्रियेत सुलभता देण्याची मागणी व्यक्त केली आहे.एफडीएचे अधिकाऱ्यांनी सांगितले की राज्यभरातील अवैध गुटखा पुरवठादार आणि बनावट औषध वाहकांना मोठा आर्थिक फटका बसला असून पुढील काही आठवड्यांत आणखी तपास व छापे होणार आहेत. स्थानिक पोलीस दल आणि एफडीए निरीक्षक सतर्क असून माहितीदार लोकांना तात्काळ कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


सरकारची ही कडक भूमिका ग्राहकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि अन्न–औषध बाजारातील कायदेशीरतेची पुनर्स्थापना करण्यासाठी महत्त्वाची आहे. प्रशासनाने जप्त केलेल्या मालाची व परवाने रद्द केलेल्या प्रकरणांची सविस्तर यादी लवकरच प्रसिद्ध केली जाईल, असे अधिकाऱ्यांच्या तोंडून सांगितले गेले.

## उपचारांचा ९० टक्के खर्च रुग्णांच्याच खिशातून

**पुणे :** आयुष्मान भारत, महात्मा फुले जनआरोग्य योजनांच्या माध्यमातून रुग्णांना खासगी रुग्णालयांतही मोफत उपचार केले जात असल्याचा गवगवा होत असला तरी, यामागील वास्तव चित्र समोर आले आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने केलेल्या वार्षिक सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात रुग्णालयात उपचारांसाठी सरासरी खर्च ४४,७७८ इतका असून त्यापैकी ९० टक्के म्हणजे ४०,४९५ रुपये रुग्णांना स्वत:च्याच खिशातून भरावे लागत आहेत. सरकारी, खासगी आणि ट्रस्टमार्फत चालवण्यात येणाऱ्या सर्वच रुग्णालयांत थोड्याबहुत फरकाने हीच परिस्थिती पाहायला मिळत आहे.

केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जानेवारी ते डिसेंबर २०२५ दरम्यान केलेल्या 'कुटुंब सामाजिक उपभोग' या सर्वेक्षणातून उघड झालेल्या माहितीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे.

या अहवालातील आरोग्यविषयक सर्वेक्षणात आरोग्य सेवा, उपचार खर्च, रुग्णालयातील दाखल रुग्ण, प्रसूती सेवा आणि वैद्यकीय खर्चाचा सविस्तर अभ्यास करण्यात आला. या सर्वेक्षणाचे जनआरोग्य



अभियानाने नुकतेच विश्लेषण केले. त्यानुसार रुग्णाला सरकारी विमा योजना लागू असूनही रुग्णालयातील उपचारांचा ९० टक्के खर्च स्वत:च्याच खिशातून करावा लागत असल्याचे स्पष्ट झाले.

सर्वेक्षणामध्ये महाराष्ट्रातील ११,१५१ कुटुंबांतील ५१,६९९ व्यक्तींचा समावेश होता. ग्रामीण भागातील सरकारी रुग्णालयांमध्ये रुग्णाला ८,०८० रुपये, विश्वस्त रुग्णालयात ३१,८१९, तर खासगी रुग्णालयांत ४४,५८० रुपये इतका सरासरी खर्च येत असल्याचे दिसते.

सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे उपचार मिळावेत, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या विमा योजना त्यामुळे अपयशी ठरताना दिसत असल्याचे निरीक्षण जनआरोग्य अभियानाने नोंदवले आहे.

**जनआरोग्य अभियानाचे विश्लेषण**

– गरिबांना आजही सार्वजनिक विमा योजनेच्या माध्यमातून पूर्ण परतावा दूरच, उपचारांसाठी पदरमोडच करावी लागत आहे.

– सर्वेक्षणादरम्यान राज्यातील ४१ टक्के लोकांची सार्वजनिक विमा योजनेत नोंदणी झाल्याचे दिसले, पण प्रत्यक्षात साडेआठ टक्के रुग्णांनाच विमा योजनेच्या माध्यमातून परतावा मिळाल्याचे आकडेवारीवरून उजेडात आले.

– सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता, तपासण्यांमध्ये होणारा विलंब, अपुरा औषधसाठा, खाटांची कमतरता आणि वाढती गर्दी यामुळे सुमारे ८० टक्के रुग्ण खासगी रुग्णालयांकडे वळतात. मात्र, तेथे उपचारांचा खर्च प्रचंड असल्याने त्याचा आर्थिक बोजा अधिक पडतो.

– 'आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य विमा योजनांचा मोठ्या प्रमाणावर प्रचार केला गेला. मात्र, प्रत्यक्षात रुग्णांना पूर्णपणे 'कॅशलेस' उपचार मिळत नाहीत.

– अनेक खासगी रुग्णालये योजनांतील रुग्णांकडून अतिरिक्त रक्कम घेतात, काही उपचार पॅकेजमध्ये नसल्याचे सांगितले जाते, तर अनेक ठिकाणी औषधे व तपासण्यांसाठी स्वतंत्र खर्च करावा लागतो.

– 'मोफत उपचार' ही संकल्पना राज्यातील आरोग्य विमा योजनांमुळे प्रत्यक्षात साकार होत नाही.

# शिक्षण क्षेत्रातील वाढते बाजारीकरण

शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरण म्हणजे ज्ञानदानासारख्या पवित्र कार्याचा व्यवसाय होय. आज शिक्षण हे समाजसेवेपेक्षा नफा मिळवण्याचे साधन बनले आहे. महागड्या शाळा, शिकवण्या आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून पालकांची होणारी आर्थिक लूट ही याच बरोबर विविध विषयांवरील शिकवण्या हे सर्व शैक्षणिक क्षेत्राचे बाजारीकरणच आहे. शिक्षणाच्या वाढत्या बाजारीकरणाने सामान्य वर्ग त्रस्त झाला आहे.

१)- "सा विद्या या विमुक्ते" (जी माणसाला मुक्त करते तीच खरी विद्या) अशी आपल्या संस्कृतीत शिक्षणाची व्याख्या होती. मात्र, आजच्या आधुनिक युगात शिक्षणाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. पूर्वी शिक्षण हे एक पवित्र व्रत व समाजसेवा मानली जात होती. परंतु आजच्या युगात शिक्षण हे एक फायदेशीर उत्पादन (Product) आणि उद्योग बनले आहे. या प्रक्रियेलाच 'शिक्षणाचे व्यवसायिक बाजारीकरण' असे म्हणतात.

२)- बाजारीकरणाची कारणे

.खाजगीकरणाचे वाढते वारे:- शासकीय शाळा आणि महाविद्यालयांपेक्षा खाजगी शिक्षण संस्थांचे जाळे वेगाने पसरत आहे. विविध विषयांवरील अभ्यासक्रमाचे वाढते व्यवसायीक धोरण...

शिक्षण क्षेत्रातील वाढती नफाखोरी:- अनेक शिक्षण संस्था व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून चालवल्या जातात. डोनेशन, अनिर्बंध फी आणि इतर शुल्काच्या नावाखाली विद्यार्थ्यांची सर्रास लूट केली जाते.

पालकांची मानसिकता:- चांगल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकवणे हा आज प्रतिष्ठेचा विषय बनला आहे. या मुळे पालक ही कर्ज काढून महागड्या शाळांचा मार्ग निवडतात.

कोचिंग क्लासेसची संस्कृती:- शाळा आणि महाविद्यालयांवर विश्वास न ठेवता महागड्या कोचिंग क्लासेसचे जाळे शहरांपासून ते ग्रामीण भागापर्यंत पसरले आहे. या लोकांच्या फिसची पुर्तता करतांना पालक वर्गाची प्रचंड पिळवणूक होत आहे. त्यात प्रवेश पुर्व परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी जिवघेण्या स्पर्धा या साठी होणारे प्रंचड व्यवहार पेपर फुटी सारखे भ्रष्ट प्रकार या सारख्या अनेक बाबी शैक्षणिक क्षेत्राला बाजरू करत आहेत.

३) - शिक्षणाच्या बाजारीकरणाचे दुष्परिणाम गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित:- खाजगी आणि आंतरराष्ट्रीय शाळांची फी सर्वसामान्यांच्या पालक वर्गाच्या आवाक्याबाहेर गेली आहे. या मुळे गुणवत्ता असूनही गरीब विद्यार्थी चांगल्या शिक्षणापासून वंचित राहवे लागत आहे. भ्रष्ट मार्गाने विविध प्रकारच्या वशिले बाजी पैशाची प्रचंड उलथापालथ या सारख्या स्पर्धा गुणवत्ता धारक विद्यार्थी वर्गावर अन्याय करतात.

मानसिक तणाव:- व्यावसायिक स्पर्धा वाढल्यामुळे विद्यार्थ्यांवर लहान वयापासूनच गुणांचे ओझे लादले जाते.

नैतिकमूल्यांचा ऱ्हास:- शिक्षणात संस्कार आणि नैतिक मूल्यांपेक्षा फक्त 'मार्क्स' आणि 'पैसे' या दोनच गोष्टींना महत्त्व दिले जात आहे. हि बाब शिक्षण क्षेत्राला वाळवी सारखी पोखरत आहे.

४) - शैक्षणिक बाजरीकरणास रोखण्यासाठी काही उपाय योजना करणे गरजेचे आहे.

शासकीय शाळांचे सक्षमीकरण:- शासनाने सरकारी शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत, जेणेकरून गरीबातील गरीब मुलालाही मोफत व दर्जेदार शिक्षण मिळेल. विविध व्यवसायिक सर्व अभ्यासक्रम, तंत्रशिक्षण, आरोग्य विविध शिक्षण या बाबत अंतिम निर्णय व निर्बंध शासनाचा असावा.

शिक्षणावर नियंत्रण असावे:- शिक्षण संस्थांमधील डोनेशन आणि अव्वाच्या सव्वा फी आकारणीवर शासनाने कठोर कायदे करून नियंत्रण ठेवले पाहिजे.

व्यावसायिकतेला आळा:- शिक्षणाचा पाया हा 'सेवा' असायला हवा, 'नफा' नाही, ही जाणीव संस्थाचालकांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे. रोजगारभिमुख अभ्यासक्रम: पारंपारिक शिक्षणासोबतच कौशल्य आधारित शिक्षण देऊन बाजारीकरणाला आळा घालता येऊ शकतो. या साठी शासनाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. खाजगी शाळा,क्लासेस यांच्यावर पेपर फोडणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाच्या नावा खाली मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण करणे या सारख्या गुन्हेगारीला कडक कठोर शिक्षा करण्याची कारवाई करण्यात आली पाहिजे. तरच काही प्रमाणात बाजारीकरणाला आळा बसेल. शिक्षण हे देशाचे भविष्य घडवणारे माध्यम आहे. जर शिक्षण फक्त श्रीमंतांची मक्तेदारी बनली,तर सामाजिक समतोल ढासळेल. शिक्षणाच्या बाजारीकरणाला वेसण घालणे हे केवळ शासनाचेच नव्हे, तर समाजाचेही कर्तव्य आहे. शिक्षण सर्वांसाठी समान आणि सहज उपलब्ध असले पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होईल.

**लेखक**
**डॉ.राजेंद्र मुरलीधर सानप**
**सदस्य - महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ,**
**इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बीड.**



# अभंग निरूपण

निरूपणकार : ह.भ.प. तुळशीराम लबडे महाराज, अहिल्यानगर


**अभंग :**

उठोनियां प्रात:काळीं ।
तुळस वंदावी माऊली ।
तुळस संतांची साऊली ।
मुगुटीं वाहिली विष्णूनें ॥१॥

तुळस असे ज्यांचे द्वारीं ।
लक्ष्मी वसे त्यांचे घरीं ।
येवोनी श्रीहरि ।
क्रीडा करी स्वानंदें ॥२॥

तुळसीसी मंजुरा येतां ।
पळ सुटे यमदूतां ।
अद्वैत तुळस कृष्ण स्मरतां ।
नासे दुरित चित्तांचें ॥३॥

जे जे तुळसी घालिती उदक ।
ते नर पावती ब्रह्मसुख ।
नामा म्हणे पंढरीनायक ।
तुळसी जवळी उभा असे ॥४॥



SANT NAMDEV MAHARAJ

**शब्दार्थ :**

- मुगुटी – मस्तकावर
- वाहिली – अर्पण केली
- स्वानंदे – स्वमग्न, स्वत: आनंदे
- मंजुला – मंजुळा
- दुरित – दुर्जे पण

**आशय :**

तुळशी ही पवित्र आहे. तीचे दर्शन,तीला पाणी घालणे, सेवा करणे यामुळे मनुष्य शुद्ध होतो . त्याला ब्रह्म सुख मिळते.

**भावार्थ :**

1. सकाळी सकाळी उठल्यावर तुळसीला वंदन करावे. तुळस संतांना सावली देते म्हणजे विसावा, विश्रांती देते. विष्णू ने आपल्या मस्तकावर तीला धारण केले आहे.
2. तुळस ज्याचे अंगनात, घरासमोर असते तेथे लक्ष्मी चा अखंड वास्तव्य असते. लक्ष्मी आल्यावर देव पण तीच्या मागे येतात आणि आनंदाने काही खेळ खेळतात.
3. तुळसीला मंजुळा आल्यावर यमदुत् सुध्दा पळून जातात. तुळस आणि कृष्ण हे एकच आहेत असा जेव्हा दृढ भाव होतो तेव्हा चित्तातील द्वैत भाव नष्ट होतो.
4. जे जे मनुष्य तुळसीस पाणी घालतात ते ते सर्व ब्रह्म सुख प्राप्त करतात. नामदेव महाराज म्हणतात पांडुरंग सुध्दा तुळसी शेजारीच उभे आहेत.

**शिकवण :**



- घरा समोर तुळसी वृंदावन असावे.
- तुळसीचे नित्यनेमाने रोज दर्शन घ्यावे
- तुळसीस रोज पाणी घालावे.

# विवेकानंद ते कलाम - येवद्याच्या व्यासपीठावरून खासदार डॉ.अनिल बोंडे यांची युवापिढीला राष्ट्रकेंद्री साद

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : "देशाचा विकास करायचा असेल तर सर्वात आधी तरुणांचे चारित्र्य आणि व्यक्ती निर्माण होणे गरजेचे आहे. 'व्यक्ती निर्माण ते राष्ट्र निर्माण' हाच भारताला जागतिक महासत्ता बनवण्याचा एकमेव मार्ग आहे. जेव्हा या देशातील युवा पिढी सक्षम, सुशिक्षित आणि राष्ट्रप्रेमाने प्रेरित होईल, तेव्हाच 'समर्थ युवा, समर्थ भारत' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल," असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले. दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे 'स्वयंम मल्टीपर्पज फाउंडेशन'च्या वतीने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या ऐतिहासिक आणि अत्यंत दिमाखदार सोहळ्याला मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. आपल्या ओघवत्या आणि प्रेरणादायी भाषणात खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी राष्ट्रनिर्माणात तरुणांच्या भूमिकेवर विशेष प्रकाश टाकला. विविध महापुरुषांची उदाहरणे देत त्यांनी उपस्थित तरुणाईमध्ये नवा जोश भरला. ते म्हणाले की, "स्वामी विवेकानंदांनी सांगितलेला 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्तीशिवाय थांबू नका' हा मंत्र आजच्या डिजिटल युगातही तितकाच लागू पडतो. तरुणांनी केवळ स्वतःच्या प्रगतीचा विचार न करता राष्ट्रहिताला प्राधान्य दिले पाहिजे. क्षमतेचा वापर देशासाठी करणे हीच खरी देशभक्ती आहे."

पुढे बोलताना त्यांनी मिसाईल मॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या 'विंग्स ऑफ फायर' (अग्निपंख) चा दाखला दिला. "डॉ. कलाम यांनी नेहमीच तरुणांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची शिकवण दिली. कलामांचे जीवन हे व्यक्ती निर्माणातून राष्ट्र निर्माण कसे होते, याचे जिवंत उदाहरण आहे," असे डॉ. बोंडे यांनी नमूद केले. त्यांच्या या मांडणीने आणि राष्ट्रकेंद्री विचारसरणीने कार्यक्रमाला उपस्थित शेकडो तरुण आणि विद्यार्थी कमालीचे आकर्षित झाले.



**'शिवाजी संस्थे'च्या स्पर्धा परीक्षा अकॅडमीतून शेकडो अधिकारी घडताहेत: हेमंत काळमेघ**

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी तळागाळातील सर्वसामान्य आणि गोरगरीब नागरिकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे मोलाचे कार्य केले. त्यांच्या याच दूरदृष्टीमुळे आज आपला समाज प्रगतशील आणि सुशिक्षित म्हणून ओळखला जातो," असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी सदस्य हेमंत काळमेघ यांनी यावेळी केले. शिक्षणापासून एकही गरजू वंचित राहू नये, यासाठी गोरगरीब नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना आवश्यक ती सर्व मदत श्री शिवाजी शिक्षण संस्था करेल, असे आश्वस्त त्यांनी यावेळी केले.>पुढे बोलताना हेमंत काळमेघ यांनी सांगितले की, "भाऊसाहेबांचा हाच वारसा पुढे चालवत संस्थेने स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रातही मोठे पाऊल टाकले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा अकॅडमीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेकडो विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर अधिकारी म्हणून विराजमान होत असल्याचे त्यांनी सांगितले.

**दर्यापूर-येवदा परिसरातील गुणवंतांचा गौरव**

या सोहळ्यात येवदा परिसरातील ग्रामीण भागातील शेकडो गुणवंत मुला-मुलींचा सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. आपल्या ग्रामीण भागातील मुलांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले यश कौतुकास्पद असून, हेच विद्यार्थी उद्याच्या सशक्त भारताचे शिल्पकार आहेत, असा विश्वास डॉ. बोंडे यांनी व्यक्त केला.



**दिग्गजांची मांदियाळी आणि मोठा जनसमुदाय**

या ऐतिहासिक सोहळ्याला परिसरातील नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. या कार्यक्रमाला अमरावती जिल्ह्यातील अनेक राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील प्रमुख मान्यवर उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, ग्रामीण शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष बाळासाहेब वानखडे, जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती बाळासाहेब हिंगणीकर, दर्यापूर कृषी उत्पन्न समितीचे संचालक मनिषभाऊ कोरपे, मदन पाटील बायस्कार, सलीमभाई घानिवाले, भाजपचे ज्येष्ठ नेते रामदास कराळे गुरुजी, ओमप्रकाशजी शर्मा, बाळासाहेब वडतकर, तसेच येवदा येथील तंटामुक्ती अध्यक्ष भरतभाऊ गावंडे उपस्थित होते.त्याचप्रमाणे पक्षाचे आणि सामाजिक क्षेत्रातील प्रमुख पदाधिकारी श्यामभाऊ ठाकरे, नितीनभाऊ बढे, चंदूभाऊ रघुवंशी, मयूरभाऊ वांदे, माजी उपसभापती रामेश्वर इंगळे, डॉ. संजय पाटील, श्रीधर हिवसे, दीपक कंटाळे, पुरण मोहोड, रघुनाथ खलोकार, अनिल गावंडे, प्रशांत गोडचर, माला डोईफोडे, किरण देशमुख, प्रिती गिरपुंजे, शेषराव तायडे, सतीश टोलमारे, प्रकाश बावनकुळे, दिलीप दवंडे, प्रज्वल गावंडे, प्रेमसागर आसरे, दिनेश मुंडाले, चंद्रशेखर पवार, सोपान सोळंके, प्रकाश तायडे, कनक सोनटक्के यांच्यासह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके आयोजन आणि दर्जेदार व्यवस्थापनामुळे हा सत्कार समारंभ दर्यापूर तालुक्यात प्रदीर्घ काळ स्मरणात राहील असा ठरला.

उपस्थित सर्व पालकांनी आणि नागरिकांनी खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या मार्गदर्शनाचे आणि स्वयंम फाउंडेशनच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.एक अनोळखी बेवारस इसम वय अंदाजे वय - 40 ते 45 वर्षे, रंग - सावळा, उंची अंदाजे



5 फुट, चेहरा गोल, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस काळे-, दाढी फ्रेंच कट, उजव्या हाताचे कोपराजवळ किरकोळ जखम, अंगात नेसुन चॉकलेटी रंगाची मळकटलेली हाप पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सपोनि प्रवीण फडतरे यांच्याशी संपर्क साधावा.

## भर उन्हात 2027 जनगणनेचा पहिला टप्पा यशस्वी; शिक्षकांचे परिश्रम कौतुकास्पद

**दैनिक युवक आधार**

**पूर्णा | प्रतिनिधी : शिवाजी लोंढे** : विद्या प्रसारिणी सभा, पूर्णा अंतर्गत 2027 जनगणनेचा पहिला टप्पा भर उन्हामध्ये यशस्वीपणे पार पडला. या जनगणना मोहिमेत श्री गणेश कोलगाने सर व श्रीकांत मोगले सर यांनी प्रामाणिकपणे व जबाबदारीने आपली कर्तव्ये पार पाडत नागरिकांकडून आवश्यक माहिती संकलित केली.

उन्हाची तीव्रता असतानाही दोन्ही शिक्षकांनी परिसरात जाऊन जनगणना कार्य काटेकोरपणे पूर्ण



केले. त्यांच्या मेहनतीमुळे जनगणनेचा पहिला टप्पा सुरळीत व यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले. या कार्याबद्दल परिसरातून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

## देवणी तहसील कार्यालयाच्या आवारातून जप्त पोकलेन गायब; महिनाभरानंतर अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी येथील तहसील शासकीय गोदाम आवारातून अवैध माती वाहतूक प्रकरणी जप्त करण्यात आलेली पोकलेन मशीन रहस्यमयरीत्या गायब झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, महसूल विभागाच्या ताब्यात असलेली ही जप्त यंत्रणा गायब झाल्यानंतर, तब्बल एक महिन्याने अज्ञात व्यक्तीविरुद्ध देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




**सुरक्षेचा बोजवारा: प्रशासनावर प्रश्नचिन्ह**

शासकीय ताब्यात असलेली आणि एवढी मोठी यंत्रसामग्री (पोकलेन) तहसील कार्यालयाच्या आवारातून अचानक गायब झाल्याने प्रशासकीय सुरक्षेचा बोजवारा उडाला आहे. अत्यंत गजबजलेल्या शासकीय कार्यालयाच्या आवारातून कोणाच्यातरी मदतीशिवाय किंवा संगनमताशिवाय एवढी मोठी मशीन बाहेर नेणे शक्य आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

भारतीय न्याय संहितेनुसार (BNS) गुन्हा दाखल

देवणी पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, तहसील कार्यालयाच्या ताब्यातील पोकलेन मशीन गायब झाल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३ (चोरी) अंतर्गत गुन्हा नोंद झाल्याचे समजते. शासकीय मालमत्ता अनधिकृतरीत्या पळवून नेल्याप्रकरणी पोलीस आता पुढील तपास करत आहेत.

तपासाची दिशा आणि संभाव्य कायदेशीर कारवाई

विभागीय चौकशीची शक्यता: या प्रकरणात शासकीय कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा किंवा संगनमत आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी होऊन त्यांची जबाबदारी निश्चित केली जाऊ शकते.

**अतिरिक्त कलमांची वाढ**

तपासादरम्यान पुरावे नष्ट करणे, कर्तव्यात हलगर्जीपणा किंवा गैरव्यवहार सिद्ध झाल्यास गुन्ह्यामध्ये इतर पूरक कलमांचा समावेश केला जाऊ शकतो.

६० ते ९० दिवसांत दोषारोपपत्र: कायद्यानुसार गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास गतीने सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, पंचनामा, कार्यालयातील पहारेकरी, महसूल अधिकारी आणि संबंधित कर्मचारी यांचे जबाब नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. तपासाच्या गुंतागुंतीनुसार पुढील ६० ते ९० दिवसांच्या आत न्यायालयात दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल केले जाणे अपेक्षित आहे.

या गंभीर प्रकरणाचा छडा लावून चोरीला गेलेली पोकलेन मशीन जप्त करणे आणि यामागील खऱ्या सूत्रधारांना गजाआड करणे हे आता पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे.

## आरोग्य केंद्राची प्राथमिकता नागोठण्यासाठी महत्वाची

### केंद्र शहरातच स्थलांतरीत करावे नागोठणे पत्रकार संघाची आग्रही भूमिका

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे वार्ताहर :** येथील रायगड जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र तात्पुरत्या स्वरुपात येथून सहा किलोमीटर अंतरावरील वांगणी- आमडोशी येथे हलविण्याचा घाट आरोग्य विभागाने घातला असून, याला नागोठणे पत्रकार संघाने तीव्र विरोध केला आहे. आरोग्य केंद्राची प्राथमिकता नागोठण्यासाठी महत्वाची असून हे केंद्र नागोठणे शहरातच स्थलांतरीत करावे अशी आग्रही भूमिका पत्रकार संघाने घेतल्याचे अध्यक्ष उदय भिसे यांनी सांगितले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना भिसे यांनी सांगितले की, रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक झाल्यानंतर नागोठणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला सुगीचे दिवस येणार हे निश्चित झालयं असून या केंद्राचे रूपडं कधी पालटणार याची नक्की अशी डेडलाईन समोर आली नाही, मात्र हे आरोग्य केंद्र नागोठण्यापासून दक्षिणेकडे सहा किलोमीटर अंतरावर वांगणी-आमडोशी येथील सुप्रीम पेट्रोकेमच्या वास्तुत स्थलांतरित करण्यात येणार




असल्याचे स्पष्ट झाले आहे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या एका पत्रानुसार सुप्रीमच्या इमारतीसाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला त्यासाठी पैसे अर्थात भाडं मोजायचं आहे. मुळातच ही इमारत सुप्रीम पेट्रोकेमने नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी उपकेंद्र म्हणून बांधली असल्याची माहिती समोर येत आहे. तसेच रा.जि.प.ची या जिल्ह्यात जी काही महत्वाची आरोग्य केंद्र आहेत त्यात नागोठण्याचे केंद्र टॉप फाईवमध्ये असेल यात बिलकूल शंका नाही. एकतर हे केंद्र (किंवा रुग्णालय) वाहनांची अव्याहत वर्दळ असलेल्या मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गावर आहे.

नागोठण्याची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच असून, उद्योगांचा पसाराही वाढत आहे. आसपास आदिवासी वाड्यावस्त्याही मोठ्या प्रमाणावर आहेत. हे सर्व मुद्दे लक्षात घेऊन या प्राथमिक आरोग्य केंद्राला सुसज्जतेचा बुस्टर डोस द्या ही गेल्या अनेक वर्षांची मागणी आहे. स्थानिक पत्रकार म्हणून ही मागणी मी स्वतः प्रसारमाध्यमांतून अनेकदा लावून धरलेली आहे. परंतु थातूरमातूर मलमपट्टीपलीकडे काहीही घडलेलं नाही. कधी काळी नागोठण्यात खमक्या नेत्यांची वानवा नव्हती. आता असे नेतेच नागोठण्यात उरले नाहीत. आज असे नेतृत्व असते तर प्राथमिक आरोग्य केंद्र तात्पुरते का होईना पण ते स्थलांतरित करताना जिल्हा परिषदेला दहादा विचार करावा लागला असता.सुप्रीम पेट्रोकेमने उपकेंद्र बांधून दिलंय हे ठीक आहे, वांगणी आणि परिसराला चांगली आरोग्य सेवा मिळावी याला कुणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. तेथील आरोग्य उपकेंद्र सक्षमतेने सुरू करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने पावले उचलावीत, त्याचे स्वागत आहे. पण नागोठण्याचे संपूर्ण केंद्रच तेथे हलविणे अप्रस्तुत आहे. नागोठणे शहरात ज्या काही शासकीय, निमशासकीय मोकळ्या इमारती आहेत त्या ठिकाणी हे केंद्र तात्पुरत्या स्वरुपात सुरू करता येईल का, हे पाहिले पाहिजे. पावसाळ्यात गैरसोयीची ठरणार नाही, रुग्णवाहिकेची जा-ये सुकर ठरेल, वाहने उभी राहण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध होईल याची काळजी घ्यावी लागेल. केंद्राच्या स्थलांतराचा घाट घातला जात असताना नागोठणे ग्रामपंचायतीला विश्वासात का घेण्यात आले नाही,तसेच आरोग्य केंद्र स्थलांतराच्या मुद्द्यावरून सर्वच राजकीय पक्षांना आवाज उठविण्याची नामी संधी उपलब्ध झाली होती. परंतु कडक उन्हामुळे (कदाचित) ती संधी हुकवण्यात आली. असो. या एकूणच निर्माण झालेल्या गदारोळात रायगड जिल्हा परिषदेचे स्थानिक सदस्य म्हणून सुमीत काते यांची नेमकी भूमिका काय आहे, हेही स्पष्ट झाले पाहिजे किंबहुना सर्वसामान्य माणूस ही भूमिका जाणून घेण्यास उत्सुक असल्याचे सांगून आरोग्य केंद्राची 'प्राथमिक'ता नागोठण्यासाठीच महत्त्वाची असल्याचे सांगून तीच आग्रही नागोठणे पत्रकार संघाचीही भूमिका असल्याचे उदय भिसे यांनी सांगितले आहे.

## पाणगळत्या बाभळीचे प्रतिबिंब

मराठी साहित्यातील कवितेच्या दालनात वेगवेगळ्या कवींनी बाभळीचे वर्णन कवितेत केले आहे. कवी. अनिल देशपांडे यांनी "शरदागम" कवितेत म्हणतात की ,

**"काठावरच्या प्रसंन्न बाभळी**
**वाकुन पाहती रूप सावळे"**

शरद ऋतूतील नदी किनारी भागात दहाडातील बाभळीचे प्रतिबिंब कवितेत साकारले आहे.कवी वसंत बापट म्हणतात.

**"अस्सल लाकूड भक्कम गाठ**
**ताठर कणा टणक पाठ**
**वारा खात गारा खात**
**बाभुळ झाड उभेच आहे"**

पावसाळ्यात कितीही वादळं आली आणि गारपीट झाली तरी बाभुळ झाडाला कसलाही धक्का पोहोचत नाही याचे वर्णन केले आहे.आदिवासी डोंगराळ भागात नदी किनारी बाभळीची झाड आजही काही प्रमाणात आहेत. गुराखी गाई गोठतात 'बाभुळ वनात गाईची गोठण' असे लोकगीतात वर्णन आले आहे.आदिवासी डोंगराळ भागातील निसर्गाच्या सानिध्यातील लोक डोंगर मावलीचे (भायाचे) कार्यक्रम पौष महिन्यात साजरे करतात घांगळभक्तीची लोककथा सादर केली जाते. कथेत निसर्गाच्या सानिध्यातील दरी खोलीतील निसर्ग देवतांनालेख लेख निमंत्रण दिले जाते म्हणजे मान दिला जातो.

**" मान जातो बाभळी भष्याल"**

अशी घांगळभक्तीच्या तालावर आळवणी केली की लोकांच्या अंगात देव येते. ते देव येणारा माणसं बाभळीच्या काट्यावर नाचतात लोळतात त्याला कोणत्याही प्रकारची ईजा होत नाही. डोंगर मावलीच्या कार्यक्रमात अंगात देव येणे याला संमोहन शास्त्राचा आधार आहे. बाभळीचे लाकूड भक्कम आणि टणक असल्याने त्याला पीठी लागत नाही.त्यापासून शहरी भागात बाकडा,खुर्ची,दरवाजा अशा लाकडी वस्तू बनवून विक्री केली जाते.शहरी आणि ग्रामीण भागात खाटीक लोकं धंद्यासाठी चिकन,मटण तोडण्यासाठी बाभळीचे खोडाचा ठोकळा वापरतात.बाभळीच्या झाडाचा डिंक लाडू बनवताना वापरतात डिंक आयुर्वेदिक औषधी असल्याने सांधेदुखी, कंबरदुखी असे आजार बरे होतात बाभुळ. हा बारमाही फुलणारा वृक्ष आहे.

**सुभाष कामडी**
**( आदिवासी साहित्य अभ्यासक)**

# वाढत्या अपेक्षा विवाह प्रमुख मार्गातील अडथळा

समस्या हि अचानक निर्माण होतं नाही कळतं न कळतं समस्या निर्माण होण्यासाठी आपणं जबाबदार असतोच मात्र आपण जबाबदारी स्वीकारून बदल घडविण्यासाठी प्रयत्न करतं नाहीत हिचं मोठी समस्या आहे. वधू आणि वर या उभयतांच्या प्रचंड मोठ्या प्रमाणात अवाजवी अपेक्षा वाढत चालल्याने विवाहा बाबत पालक वर्गात चिंतेच सावट आहे.विवाह हा भारतीय संस्कृती नुसार परंपरा तर आहेच शिवाय आदर्श जीवन पद्धती सुद्धा आहे तसेच प्रत्येक व्यक्ती साठी विवाह हा एका प्रकारे अनिवार्य प्रकार देखील आहे आणि त्या अनुषंगाने विवाह हा योग्य वेळी पार पडलाच पाहिजे.याचा अर्थ बालविवाह नाही मात्र एका मर्यादेपेक्षा जास्त कालावधी पण झाला नाही पाहिजे म्हणजे च योग्य वेळ साधन महत्वाचे परंतु सध्या ज्या सामाजिक समस्या उग्र रूप धारण करत आहेत त्यानुसार विवाहासाठी जी निश्चित अशी एक वयोमर्यादा आहे त्या मर्यादेत किंवा त्या कालावधीत विवाह योग अनेक अशा कारणांमुळे घडुन येत नसल्याने अनेक पालक आपली जबाबदारी आणि कर्तव्य पार पाडत असताना चिंतेत आहेत हे वास्तव कटु सत्य आहे

कारण हि तसंच आहे स्थळ शोधताना होणारी दमछाक तसेच विवाह बदल आपल्या पाल्याच्या मनात नेमकं काय चाललंय याचा वेध घेण्यात सध्याचे पालक चुकत आहेत हि सगळ्यात मोठी गंभीर समस्या आहे आणि भयान असं वास्तव आहे आणि योग्य वेळी विवाह होत नसल्याने तरुण मुलं मुली हे लग्न होत नसल्याचा तणाव घेत आहेत आणि आपल्या मनातील हि बाब ते इतर कोणालाही सांगू पण शकत नाहीत हि बाब हास्यास्पद जरी वाटत असली तरी कटु सत्य आहे आपण पण त्याच अवस्थेतेतुन आलो आहोत सध्या तर विवाह च्या संदर्भात जीवन पद्धती बदलल्यामुळे साहजिकच अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत कारण जीवनातील गरजा पण वाढल्याने आणि भौतिक सुख सुविधा मिळवत असताना होणारी दमछाक आणि विवाह च्या अनुषंगाने निर्माण झालेल्या अवास्तव अपेक्षा यामुळे विवाह योग जुळवून येण्यासाठी अनेक समस्या अडचणी निर्माण झाल्या आहेत तसेच अवास्तव अशी हुंडा पद्धती तसेच वेगवेगळ्या सामाजिक परंपरा आणि याचे परिणाम सामाजिक पातळीवर होताना दिसत आहेत वास्तविक विवाह हा योग्य वयात होण आवश्यक आहे अपेक्षित आहे परंतु सध्याच्या काळात असं होताना मुळीच दिसत नाही.आपल्या भावी जोडीदार बाबतीत अपेक्षा असण्या मध्ये काही गैर नाही परंतु सगळ्याच अपेक्षा लग्नाच्या अगोदर पुर्ण होतिल किंवा तशी परिस्थिती असेल असं नाही जीवनातील काही बाबी खास करून आर्थिक बाबींशी निगडित त्या नंतर पण पुर्ण होऊ शकतील आणि म्हणून योग्य, समजदार, संस्कारित , होतकरू,मेहनती , चिकाटी, जिद्द, आणि जीवना प्रति सकारात्मक पद्धतीने पाहण्याचे गुण आपल्या जोडिदार मध्ये पाहावे बाकी बाबी ला फार महत्त्व न देता दोन्ही बाजुने अवास्तव अपेक्षा सोडुन सामंजस्याची भुमिका घेतली तर नक्कीच सध्या च्या परस्थिती मध्ये विवाह च्या अनुषंगाने जो गतीरोधक एक भयनाक अशी समस्या निर्माण त्या अनुषंगाने सामाजिक मनस्थितीत बदल होणे आवश्यक आहे त्या मुळे योग्य वेळी विवाह न होण्याची जी सामाजिक समस्या निर्माण झाली आहे ती नक्कीच दुर होईल आणि योग्य वेळी विवाह हे संस्कार पार पडतील सामाजिक स्थिती एकदम योग्य राहिल म्हणून प्रत्येकाने आपापल्या अपत्याच्या विवाहाच्या अनुषंगाने चिंतेची बाब उरणार नाही .

# नविमुंबई ओव्हळे परिसरात विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा विध्वंस ?

## खारफुटी नष्ट करून नियमबाह्य भराव-बांधकामांवर आक्षेप

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी प्रतिनिधी :** नवी मुंबई एअरपोर्ट जवळल उरण तालुक्यातील ओव्हळे परिसरात ऑइल पुरवठा करण्यासाठी खाजगी कॉन्ट्रॅक्टर विकासकामांच्या नावाखाली गंभीर पर्यावरणीय नियमभंग करत असल्याच्या तक्रारी पुढे येत असून, समुद्र खाडी परिसरातील संवेदनशील भागात खारफुटी नष्ट करून मातीचा भराव टाकत नियमबाह्य पद्धतीने बांधकामे सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. पर्यावरणदृष्ट्या अतिसंवेदनशील समजल्या जाणाऱ्या या परिसरात किनारी नियमन क्षेत्र (CRZ) तसेच बफर झोनच्या नियमांचे उघड उल्लंघन होत असल्याने भविष्यात मोठ्या दुर्घटनेची भीती व्यक्त केली जात आहे.




स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, विकासकांनी स्थानिक स्तरावरील ठेकेदारांना हाताशी धरून समुद्र खाडी परिसरातील नैसर्गिक रचनेत मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप सुरू केला आहे. हि पाईप लाईन अटल सेतू पर्यंत अंडर ग्राऊंड जात आहे . जॉब ऑर्डर नियमानुसार त्याठिकाणी पाईप जमिनीत पुरल्या गेल्या नसल्याची शंका या ठिकाणी व्यक्त केली जात आहे तर काही ठिकाणी खारफुटी नष्ट करून ते असुरक्षित पाईप वर्क केले जात आहे. खाडीत टाकण्यात येणारा मातीचा भराव केवळ पर्यावरणीय समतोल बिघडवणारा असून पूर, भूक्षरण आणि समुद्री आपत्तींसाठी धोकादायक परिस्थिती निर्माण करणारा असल्याचा आरोप केला जात आहे.

विशेष म्हणजे, या प्रकाराचा सर्वाधिक फटका पारंपरिक मासेमारी करणाऱ्या स्थानिक कोळी बांधवांना बसत असल्याचे सांगितले जात आहे. खाड्यांमध्ये अतिक्रमण वाढल्याने मासेमारीच्या मार्गांवर अडथळे निर्माण होत असून, त्यांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. "खाडी वाचली तरच कोळी समाज वाचेल," अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक मच्छीमारांकडून व्यक्त होत आहे.

या सर्व प्रकारात संबंधित यंत्रणांची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. विशेषतः मेरीटाईम बोर्डासह संबंधित विभागांकडून कारवाई होत नसल्याने 'बघ्याची भूमिका' घेतल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अनेक सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि पर्यावरणप्रेमी या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत असतानाही विकासकांकडून "हम करे सो कायदा" अशा पद्धतीने मनमानी सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

दरम्यान, या गंभीर आरोपांबाबत संबंधित विभागातील अधिकारी व यंत्रणांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन, स्थानिकांच्या सुरक्षेचा प्रश्न आणि कोळी बांधवांच्या हक्कांबाबत प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेणार, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.वर्क ऑर्डर नुसार काम व परवानग्या पाहता सर्व संबंधित कॉन्ट्रॅक्टर व विकासकामांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. तसेच सीआरझेड व पर्यावरण विभागाच्या नियमांनुसार नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेल्या कामांची तपासणी करून महसुली नुकसानाचीही चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली. जोपर्यंत संपूर्ण चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत संबंधित विकासकांच्या आर्थिक ध्येय-मंजुरी व अन्य प्रशासकीय परवानग्यांना स्थगिती द्यावी तसेच सदर कामांवर तात्काळ बंदी घालावी, असा इशाराही स्थानिकांकडून देण्यात आला आहे. या प्रकरणी ऍक्टिव्हिस्ट युथ शिष्टमंडळाने संबंधित प्रशासन व मंत्रालय विभागाशी पत्र व्यवहार करत असल्याचे समजते. नवनिर्वाचित जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांच्या कडे याबाबतीत माहिती दिली असता कुठल्याही प्रकारची दखल घेण्यात आली नसल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने रहिवासी क्षेत्रातील पर्यावरण समतोल राखण्यासाठी कोण जवाबदार असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची नागपूर जिल्हा शाखा पुनर्गठित; २०२६-२०२८ कार्यकारिणी जाहीर




**दैनिक युवक आधार ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नागपूर जिल्हा शाखेची २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्वेंशन सेंटर, नागपूर येथे आयोजित जिल्हास्तरीय बैठकीत नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी जिल्हास्तरीय प्रेरणा मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते.

नवीन कार्यकारिणीत प्रा. संध्या राजूरकर यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून डॉ. सुनील भगत यांच्यावर कार्यकारी अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. गौतम पाटील यांची सचिव, तर मंगला गाणार यांची सहसचिवपदी निवड करण्यात आली.

याशिवाय विविध विभागांच्या कार्यवाहपदी पुढील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे — बुवाबाजी संघर्ष कार्यवाह सुषमा शेवडे, वैज्ञानिक जाणीव प्रकल्प कार्यवाह नरेश महाजन, वार्तापत्र प्रकाशन कार्यवाह विजया ठाकरे, मानसिक आरोग्य विभाग कार्यवाह मनोहर संपत भगत, महिला सहभाग कार्यवाह प्रिया गजभिये, विविध उपक्रम कार्यवाह प्रा. पुष्पा घोडके, युवा विवेक वाहिनी कार्यवाह अर्चना मेश्राम, सांस्कृतिक विभाग कार्यवाह शशिकांत बनकर, जातीअंत विभाग कार्यवाह अरविंद तायडे तसेच कायदा कार्यवाह म्हणून ॲड. विद्या खोब्रागडे यांची नियुक्ती करण्यात आली.

ही कार्यकारिणी गठीत करण्यासाठी राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे, विजया श्रीखंडे, देवयानी भगत आणि देवानंद बडगे यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले.


कार्यक्रमात प्रा. संध्या राजूरकर, स्वाती शेंडे, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रतिनिधी, माधुरी सेलोकर तसेच फातिमा सावित्री ब्रिगेड या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मंडपे गुरुजी, देवानंद बडगे आणि वर्षा सहारे यांनी केले.

यावेळी ५ मार्च २०२६ रोजी सत्यशोधक पद्धतीने विवाह केलेल्या लखन पाटील आणि माहेश्वरी आभारे या दाम्पत्याचा मानचिन्ह व शाल देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित सर्व शाखांच्या पदाधिकाऱ्यांनाही मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला रामभाऊ डोंगरे, विजया श्रीखंडे, राम काळे, डॉ. सुनील भगत, देवयानी भगत, देवानंद बडगे, चित्तरंजन चौरे, कमलाकर सतदेवे, उमेश चित्ते, डॉ. विकास होले, सुषमा होले, ॲड. नागदिवे, गौतम पाटील, शोभा पाटील, मंगला गाणार, शशिकांत बनकर, अर्चना मेश्राम, रेडिओस्टार अरुण सहारे यांच्यासह विविध शाखांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चार महिलांना ठार करणाऱ्या वाघिणीला अखेर जेरबंद करण्यात वनविभागाला यश

**चंद्रपूर :** चार महिलांना ठार करणाऱ्या वाघिणीला जेरबंद करण्यात वन विभागाला अखेर यश मिळालं आहे. २२ मे रोजी वाघिणीनं तेंदूपत्ता संकलनासाठी जंगलात गेलेल्या १३ महिलांपैकी चार महिलांवर हल्ला करून ठार केलं होतं. त्यानंतर सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला. यापूर्वी वाघानं एकाच वेळी ४ लोकांचा बळी घेतल्याची घटना कुठंही घडली नव्हती. त्यामुळे ही वाघिण असावी आणि तिच्या सोबत तिचे पिल्ले देखील असावेत, असा संशय निर्माण झाला होता. वन विभागानं अतिशय गांभीर्यानं संपूर्ण प्रकरणात कारवाई करण्यास सुरुवात केली. अवघ्या ४८ तासात वाघिणीला जेरबंद करण्यात वन विभागाला यश मिळालं आहे. सिंदेवाही तालुक्यातील पवनपार तलाव परिसर वनविभागानं वाघिणीच्या शोधात पिंजून काढला. चार महिलांचा बळी घेणारी वाघीण याच परिसरात असल्याची खात्रीलायक माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांना



समजली होती. त्या अनुषंगानं याच भागात सर्वाधीक गस्त व पहारा वाढवण्यात आला. वाघीण वनविभागाच्या निदर्शनात पडताच संपूर्ण सावधगिरी बाळगून बेशुद्ध करण्यासाठीचा डार्ट मारण्यात आला. तो डार्ट अगदी अचूक लागल्यामुळे वाघीण काहीच क्षणात बेशुद्ध झाली.परिसरात वाघिणीच्या हलचालींवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी कॅमेरा ट्रॅप व लाईव्ह कॅमेरे तैनात करण्यात आलेले होते. एवढंच नाही तर या भागात विशेष पथकाद्वारे गस्त वाढवण्यात आली. हल्ला करणारा वाघ की वाघीण हे देखील स्पष्ट नव्हतं. हे शोधण्यासाठी २० ट्रॅप कॅमेरे आणि ३ मोशन सेन्सर लाईव्ह सीसीटीव्ही कॅमेरे देखील लावण्यात आले. अखेर सर्व प्रयत्नांना यश आलं आणि ती वाघीण जेरबंद झाली आहे.

**काय आहे घटना :** २२ मे रोजी सकाळी ८ ते ९ वाजताच्या सुमारास तेंदूपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेलेल्या एकूण १३ पैकी ४ महिलांवर वाघानं हल्ला केला. यामध्ये ४ महिलांचा मृत्यू झाल्याची घटना चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यात घडली.

जंगलात तेंदूपत्ता तोडायला गेलेल्या महिलांवर वाघानं अचानक हल्ला केला. या हल्ल्यात चारही महिलांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे सिंदेवाही तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली.



# क्षणात राजाचा रंक झालेले...

हजारो कोटीचे मालक व साम्राज्य निर्माण केलेले शिवराज मोटेगावकर व कॅप्टन अशोक खरात यांच्यासारख्यांना ज्यावेळी सीबीआय किंवा एसआयटी तोंडाला रूमाल बांधून व खांद्यावर हात ठेवून घेऊन जातात, त्याचवेळी जगात त्यांची औकात लोकांकडून काढली जाते. अनैकतेच्या खांबावर उभे असलेले साम्राज्य कधीही कोसळू शकते, हे पुन्हा एकदा सिद्ध झालं. कॅप्टन खरात ते मोटेगावकर अशी कितीतरी बलाढ्य, धनवान, राजकीय वरदहस्त असलेली लोकं क्षणात राजाचा रंक झाली आहेत. त्यामुळे शिळी भाकरी का असेना, पण आपल्या कष्टाची असावी. साम्राज्य किरकोळ का असेना, त्याच्या भिंती श्रमाच्या, सेवेच्या, स्वाभिमानाच्या अन् इमानदारीच्या असाव्यात. परंतु अर्ध्या रात्री श्रीमंत होण्याचा हव्यास अनेकांच्या मनात असल्याने, त्यांच्याकडून गैरकृत्याला पाठिंबा मिळतो. आजच्या काळात सर्वात फायदेशीर व बिनभांडवली व्यवसाय कोणते ? तर बुवा, बापु, बाबा बनणे, चमत्कारी बाबा बनणे, मठ-आश्रम खोलणे, दानावर मंदिराचे निर्माण करणे, एखाद्या मंदिराचे ट्रस्टी बनणे, भोंदू व भामटे कीर्तनकार बनणे, कथाकार बनणे, ज्योतिष बनणे, कर्मकांड करणारे बनणे किंवा यातलं काही जमत नसेल व थोडे फार भांडवल गुंतवणे शक्य असेल तर मग क्लासेस चालवणे, इंग्लिश मिडियम स्कूल काढणे, इंजिनिअरिंग, मेडिकल कॉलेज उभारणे आणि जरा जास्तच धाडस असेल तर दारू, बार, मटका हेसुद्धा आहेतच. कारण आज कोणतही उत्पादन करून ते विकण्यापेक्षा भावना विकणारा जास्त श्रीमंत होतो. ज्ञानापेक्षा "ब्रँड" विकला जातो. सेवेपेक्षा "इमेज" विकली जाते आणि लोकांच्या श्रद्धा, भीती, भविष्य यांचा बाजार मांडला की प्रचंड पैसा आपोआप चालत येतो. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणून खरात घ्या नाही तर मोटेगांवकर घ्या! ज्यांना डॉक्टर-इंजिनिअर बनायचं होतं, त्यांच्या हातात स्टेथोस्कोप किंवा नकाशा ऐवजी बेड्या पडू लागल्या आहेत. या देशात वेगवेगळ्या नावाखाली अख्ख्या शिक्षण व्यवस्थेचाच नव्हे तर नैतिकतेचाच बाजार मांडला गेला आहे. खरात काय किंवा मोटेगावकर काय, प्रसिद्धीच्या शिखरावर गेलेली ही माणसं आज पोलिसांच्या गाडीत बसताना 'कॉलरला हात घातलेले पोलीस कर्मचारी' इतके भेसूर चित्र समाजाला पाहावे लागते. एकेकाळी विद्यार्थ्यांना शिक्षण देताना नैतिकतेचा आव आणणारा मोटेगावकर तर दुसरीकडे समाजाला धर्माची व्याख्या सांगणारा भोंदू खरात हे चित्र आपण कोठे चाललो आहोत हेच दर्शविते. त्यांच्या या भयानक कृतीमुळे महाराष्ट्रातल्या श्रद्धाळू, गरीब, शेतकरी आणि कष्टाळूंचा घात झाला आहे. अनेकांचा पैसा वाया गेला आहे. घरातील किडूक मिडूक मिळून पैसा गोळा करून या दोघांच्या चरणी अर्पण करण्यात आला आहे. आपल्या पोराबाळांनी डॉक्टर, इंजिनीयर होऊन संपूर्ण घराण्याला पुढे न्यावे, ही मायबापांची इच्छा असतेच. मुलांचीही कष्ट करण्याची तयारी असते. परंतु चोरांच्या बाजारात त्यांना हार पत्करावी लागते. दुसरीकडे अध्यात्म, मन:शांती मिळेल, कुटुंबाला आचार विचार मिळेल, म्हणून एखाद्या व्यक्तीवर श्रद्धा व्यक्त करून भाबडेपणाने विश्वास ठेवला जातो. परंतु तेथेही घात होतो व यात समाज भरडून जातो. आपल्या मुलाने डॉक्टर, इंजिनियर होऊन नाव कमवावे, अशी अपेक्षा आईवडील करणारचं ना. पण खाजगी क्लासवाले त्या कुटूंबियांच्या भविष्याचा खून करून टाकतात. खरात मर्चंट नेव्हीमध्ये होता, असे बोलले जाते, तर मोटेगावकरने एम.एस्सी. सह अनेक पदव्या घेतल्या आहेत.

तरीही त्यांना 'एझीमनी' गोड वाटला. सरस्वतीच्या दरबारात राहूनही लक्ष्मीच्या पुजेसाठी कोणत्याही थराला जाणा-या माणसांना 'हैवान' हीच पदवी योग्य ठरते. खरं म्हणजे 'लातूर पॅटर्न' हे सर्व काही बकवास होते. गरीबांना मातीत गाडण्याचा त्यांचा 'हैवान पॅटर्न' होता. गोरगरीबांच्या संपत्तीची लूट करणारे हे राक्षस समाजानेच लक्ष्य केले पाहीजे. शासकीय यंत्रणा गरीबांना नव्हे तर अशा चोरांनाच अभय देतील. फक्त वातावरण शांत व्हायची ते वाट पाहतील. तर दुसरीकडे प्रश्नपत्रिका फोडून डॉक्टर झालेले 'भोंदू डॉक्टर' काय दिवे लावणार? खरात काय अन् मोटेगावकर काय वातावरण शांत व्हायची वाट पहात आहे. पण न जाणो कदाचित नागपूरच्या अक्कू यादव प्रमाणे जनताच न्यायनिवाडा करण्याची अधिक शक्यता वाटते. कारण अशा लोकांना पश्चाताप होत नसतो.

लैंगिकता व शिक्षण व्यवस्थेच्या नावाखाली ते लुटारू झाले. हजारो कोटींचे मालक झाल्याने त्यांना माज आलेला आहे. हा माज आता जनताच जिरवेल, असे वाटते.

# प्लास्टिकमुक्त पृथ्वी : आजच्या काळाची गरज

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक जीवन अधिक सुलभ केले, परंतु या प्रगतीच्या प्रवासात काही अशा गोष्टी निर्माण झाल्या ज्यांनी आज संपूर्ण पृथ्वीसमोर गंभीर संकट उभे केले आहे. प्लास्टिक ही त्यापैकीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकेकाळी सोयीचे आणि स्वस्त साधन म्हणून वापरात आलेले प्लास्टिक आज पर्यावरण, मानवाचे आरोग्य, जैवविविधता आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे. या वाढत्या धोक्याबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी 'आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन' साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे प्लास्टिकचा वाढता वापर कमी करणे, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आणि पृथ्वीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे.

आजच्या आधुनिक जीवनात प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. घरातील भांडी, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपदार्थांचे पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, वाहनांचे भाग, खेळणी, फर्निचर अशा असंख्य वस्तूंमध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकचे वजन कमी, किंमत स्वस्त आणि टिकाऊपणा जास्त असल्यामुळे त्याचा वापर झपाट्याने वाढला. परंतु याच टिकाऊपणामुळे प्लास्टिक सहज नष्ट होत नाही आणि शेकडो वर्षे पर्यावरणात तसेच राहते. परिणामी जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही घटकांचे प्रदूषण वाढत चालले आहे.

प्लास्टिकचा इतिहास पाहिला तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कृत्रिम पदार्थांच्या शोधातून त्याची निर्मिती झाली. सुरुवातीला त्याचा वापर मर्यादित प्रमाणात होत होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर सुरू झाला. स्वस्त आणि टिकाऊ असल्यामुळे प्लास्टिकने जगभरातील बाजारपेठ व्यापली. आज जगात दरवर्षी कोट्यवधी टन प्लास्टिकची निर्मिती केली जाते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक निर्माण होते आणि त्यातील मोठा भाग एकदाच वापरून फेकून दिला जातो. हे प्लास्टिक नद्यांमधून समुद्रात जाते आणि समुद्री जीवांसाठी घातक ठरते.

एकेकाळी बाजारात कापडी पिशव्या, मातीची भांडी, धातूची साधने आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तू वापरल्या जात होत्या. परंतु प्लास्टिकच्या स्वस्त आणि सोयीस्कर पर्यायामुळे पारंपरिक वस्तूंचा वापर कमी होत गेला. दुकानात खरेदीसाठी गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्या सहज दिल्या जाऊ लागल्या. बाटलीबंद पाणी, प्लास्टिक कप, चमचे, स्ट्रॉ, थर्माकोलच्या प्लेट्स आणि विविध पॅकेजिंग साहित्यामुळे प्लास्टिकचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या सोयीमागे लपलेले पर्यावरणीय संकट मात्र मानवाला उशिरा समजले.

प्लास्टिकमुळे निर्माण होणारे सर्वात मोठे संकट म्हणजे प्रदूषण. प्लास्टिक सहज कुजत नाही. जमिनीत टाकलेले प्लास्टिक अनेक वर्षे तसेच राहते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. शेतीमधील पाण्याचा निचरा अडतो. जनावरे प्लास्टिक खातात आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा कचऱ्यातील प्लास्टिक जाळले जाते. त्यातून विषारी वायू बाहेर पडतात. हे वायू मानवाच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक असतात. प्लास्टिक जाळल्यामुळे डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे विषारी घटक वातावरणात मिसळतात. त्यामुळे श्वसनाचे आजार, कर्करोग आणि त्वचारोग यांसारख्या समस्या वाढतात.

समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण ही आजची सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्या मानली जाते. दरवर्षी लाखो टन प्लास्टिक समुद्रात मिसळते. समुद्री पक्षी, कासव, मासे आणि इतर जलचर प्राणी प्लास्टिकचे तुकडे अन्न समजून खातात. त्यामुळे त्यांच्या पोटात प्लास्टिक साचते आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या जाळ्यांमध्ये समुद्री जीव अडकतात. समुद्रातील सूक्ष्म प्लास्टिकचे कण अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. मासे आणि इतर समुद्री अन्नाद्वारे हे सूक्ष्म कण पुन्हा मानवाच्या शरीरात पोहोचतात. संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की सूक्ष्म प्लास्टिक मानवी रक्त, फुफ्फुसे आणि अगदी गर्भाशयातही आढळू लागले आहे.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ पर्यावरणीय नाही तर सामाजिक आणि आर्थिक समस्याही आहे. शहरांमध्ये वाढणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामुळे गटारे तुंबतात आणि पूरस्थिती निर्माण होते. पावसाळ्यात नाले तुंबल्यामुळे शहरे जलमय होतात. यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होते. नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना कचरा व्यवस्थापनासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. प्लास्टिक कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे ही मोठी समस्या बनली आहे.

ग्रामीण भागातही प्लास्टिकचे संकट वाढत आहे. शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या, रासायनिक खतांच्या पॅकेजिंग, कीटकनाशकांच्या बाटल्या आणि विविध कृषी साहित्यामुळे शेतजमिनी प्रदूषित होत आहेत. गावांमध्ये योग्य कचरा व्यवस्थापन नसल्यामुळे प्लास्टिक उघड्यावर फेकले जाते किंवा जाळले जाते. याचा परिणाम पशुधन, माती आणि पाण्यावर होत आहे. अनेक वेळा गायी आणि इतर जनावरे कचऱ्यातील प्लास्टिक खातात. त्यांच्या पोटात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक साचल्यामुळे त्यांचा मृत्यू होतो.

मानवी आरोग्यावर प्लास्टिकचे होणारे परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. प्लास्टिकमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक रसायनांचा मानवी शरीरावर घातक परिणाम होतो. बिस्फेनॉल-ए, फ्थॅलेट्स यांसारखी रसायने हार्मोन्सच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले पाणी किंवा गरम पदार्थांमुळे या रसायनांचे प्रमाण वाढते. त्यामुळे मधुमेह, हृदयविकार, प्रजनन समस्या आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. लहान मुलांमध्ये प्लास्टिकच्या खेळण्यांमधूनही विषारी रसायने शरीरात जाण्याचा धोका असतो.

प्लास्टिकचा संबंध हवामान बदलाशीही जोडला जातो. प्लास्टिकची निर्मिती ही प्रामुख्याने पेट्रोलियम पदार्थांपासून केली जाते. त्यामुळे प्लास्टिक उद्योगातून मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू उत्सर्जित होतात. प्लास्टिक उत्पादन, वाहतूक आणि जाळण्याच्या प्रक्रियेमुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या समस्येत भर पडते. भविष्यात प्लास्टिक उत्पादन असेच वाढत राहिले तर पर्यावरणीय संकट आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा केवळ औपचारिक दिन नसून पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ आहे. या निमित्ताने जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सरकारी विभागांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. प्लास्टिक वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, कापडी पिशव्यांचा प्रचार, प्लास्टिक संकलन मोहीम आणि स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबवले जातात.

भारतानेही प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारने एकदाच वापरल्या जाणाऱ्या काही प्लास्टिक वस्तूंवर बंदी घातली आहे. अनेक राज्यांनी प्लास्टिक पिशव्यांवर निर्बंध आणले आहेत. महाराष्ट्राने प्लास्टिक बंदीबाबत कठोर निर्णय घेतला होता. प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल साहित्य आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर बंदी घालून पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न करण्यात आला. सुरुवातीला या निर्णयाला विरोध झाला, परंतु हळूहळू नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यास सुरुवात केली.

प्लास्टिक बंदी यशस्वी होण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरेसे नाहीत. नागरिकांचा सक्रिय सहभागही अत्यंत आवश्यक आहे. आपण स्वतःपासून बदल सुरू केला पाहिजे. बाजारात जाताना



कापडी पिशवी वापरणे, प्लास्टिक बाटल्यांऐवजी स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरणे, प्लास्टिक स्ट्रॉ आणि चमच्यांना नकार देणे, प्लास्टिकच्या सजावटीऐवजी नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे अशा छोट्या सवयी मोठा बदल घडवू शकतात.

शिक्षण संस्थांची भूमिका प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षणावर भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली तर भविष्यात जबाबदार नागरिक घडतील. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी मोहिमा राबवाव्यात. शाळांमध्ये प्लास्टिकऐवजी पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला पाहिजे. विविध स्पर्धा, रॅली, प्रबोधन कार्यक्रम आणि प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होऊ शकते.

महिलांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त समाज उभारण्यात महत्त्वाची आहे. घरातील खरेदी, स्वयंपाकघरातील साहित्य आणि दैनंदिन वापरातील वस्तूंमध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. त्यांनी प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारले तर संपूर्ण कुटुंबात चांगली सवय निर्माण होऊ शकते. अनेक स्वयंसेवी संस्था महिलांना कापडी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण देत आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळत आहे.

आज अनेक उद्योग आणि कंपन्याही प्लास्टिक कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. काही कंपन्या पुनर्वापर करता येणारे पॅकेजिंग वापरत आहेत. जैवविघटनशील प्लास्टिक, कागदी पॅकेजिंग आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला जात आहे. पर्यावरणपूरक उत्पादनांना ग्राहकांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्यामुळे उद्योगक्षेत्रातही सकारात्मक बदल होत आहेत. तथापि, अजूनही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर होत असल्यामुळे अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे.

पुनर्वापर आणि पुनर्चक्रण ही प्लास्टिक समस्येवर मात करण्याची महत्त्वाची साधने आहेत. सर्व प्लास्टिक टाळणे तात्काळ शक्य नसले तरी त्याचा योग्य वापर आणि पुनर्चक्रण आवश्यक आहे. घरातील कचरा ओला आणि सुका असा वेगळा केला पाहिजे. प्लास्टिक कचरा पुनर्चक्रणासाठी वेगळा जमा करणे गरजेचे आहे. अनेक शहरांमध्ये पुनर्चक्रण प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. तथापि, सर्व प्रकारचे प्लास्टिक पुनर्चक्रित होत नाही. त्यामुळे वापर कमी करणे हा सर्वात प्रभावी उपाय मानला जातो.

ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्लास्टिकमुक्त मोहिमा प्रभावीपणे राबवल्या पाहिजेत. गावपातळीवर ग्रामसभा घेऊन जनजागृती करणे, बाजारपेठांमध्ये प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देणे आणि नियमांचे कठोर पालन करणे आवश्यक आहे. शहरांमध्ये कचरा व्यवस्थापन सुधारले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली पाहिजे.

प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारण्यासाठी काही साध्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरू शकतात. उदाहरणार्थ, पाण्यासाठी स्वतःची बाटली वापरणे, चहा किंवा कॉफीसाठी स्टील किंवा मातीचे कप वापरणे, वाढदिवस आणि कार्यक्रमांमध्ये प्लास्टिक सजावट टाळणे, ऑनलाईन खरेदीमध्ये अनावश्यक पॅकेजिंगला नकार देणे आणि शक्य तितक्या नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे. या छोट्या कृतींमधून मोठा सामाजिक बदल घडू शकतो.

भारतीय संस्कृतीत निसर्गाला देवत्व मानले गेले आहे. झाडे, नद्या, पर्वत आणि पृथ्वी यांचे पूजन करण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत आहे. पूर्वीच्या काळात जीवनशैली अधिक पर्यावरणपूरक होती. पत्रावळी, मातीची भांडी, बांबूच्या वस्तू आणि कापडी पिशव्या वापरल्या जात होत्या. आधुनिकतेच्या अतिरेकात आपण या परंपरा विसरलो. आता पुन्हा एकदा पारंपरिक आणि शाश्वत जीवनशैलीकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे.

आज जगभरात 'झिरो वेस्ट' आणि 'सस्टेनेबल लिव्हिंग' या संकल्पना लोकप्रिय होत आहेत. कमीत कमी कचरा निर्माण करणे, पुनर्वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे यावर भर दिला जात आहे. अनेक देशांनी प्लास्टिक कमी करण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. काही देशांमध्ये प्लास्टिक पिशव्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाते. त्यामुळे लोक पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रवृत्त होतात.

समाजमाध्यमांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त मोहिमेत महत्त्वाची ठरत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचत आहेत. तरुण पिढी विविध अभियानांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. समुद्रकिनारे, नद्या आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यासाठी स्वयंसेवी गट काम करत आहेत. प्लास्टिक कचऱ्यापासून कलात्मक वस्तू तयार करून जनजागृती करण्याचे उपक्रमही राबवले जात आहेत.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ सरकार किंवा पर्यावरणप्रेमी लोकांचा नाही तर प्रत्येक नागरिकाचा आहे. आपण वापरत असलेली प्रत्येक प्लास्टिक वस्तू भविष्यात पर्यावरणासाठी समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे 'वापरा आणि फेका' ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. गरजेपुरतेच खरेदी करणे, टिकाऊ वस्तू वापरणे आणि कचरा कमी करणे या सवयी लावल्या पाहिजेत.

प्लास्टिकमुक्त भारत घडविण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तरुण पिढी नवीन विचार स्वीकारण्यास अधिक तत्पर असते. महाविद्यालयीन विद्यार्थी पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहेत. अनेक युवकांनी प्लास्टिकमुक्त कार्यक्रम आयोजित करणे, कापडी पिशव्यांचे वितरण करणे आणि स्वच्छता अभियान राबवणे यांसारखे उपक्रम हाती घेतले आहेत. भविष्यातील भारत पर्यावरणपूरक बनविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्येही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर केला जातो. लग्नसमारंभ, जत्रा, उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये डिस्पोजेबल प्लेट्स, कप आणि पाण्याच्या बाटल्यांचा वापर होतो. या कार्यक्रमांमध्ये पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी पत्रावळी, स्टीलची भांडी आणि पुनर्वापर करता येणारे साहित्य वापरण्याची चळवळ सुरू झाली आहे. अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

पर्यटन क्षेत्रातही प्लास्टिक प्रदूषण मोठी समस्या बनली आहे. डोंगराळ भाग, समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळांवर प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. पर्यटकांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. पर्यटनस्थळांवर प्लास्टिक नेण्यावर निर्बंध आणणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे आणि पर्यटकांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. निसर्गरम्य स्थळांचे सौंदर्य टिकवण्यासाठी प्लास्टिकमुक्त पर्यटन ही काळाची गरज आहे.

शेती आणि पर्यावरण यांचा अतूट संबंध आहे. प्लास्टिकमुळे जमिनीची सुपीकता कमी होत असल्याने शेती उत्पादनावरही परिणाम होतो. प्लास्टिक कचऱ्यामुळे पाण्याचे स्रोत दूषित होतात. ग्रामीण भागात जैविक शेती आणि नैसर्गिक जीवनशैलीला प्रोत्साहन देऊन प्लास्टिक वापर कमी करता येऊ शकतो. शेतकरी संघटना आणि कृषी विभागांनी या संदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे.

आज अनेक संशोधक प्लास्टिकला पर्याय शोधण्याचे काम करत आहेत. मका, ऊस, बटाटा स्टार्च आणि समुद्री वनस्पतींपासून जैवविघटनशील पदार्थ तयार केले जात आहेत. हे पदार्थ पर्यावरणात सहज विघटित होतात. तथापि, अशा पर्यायांचा खर्च अजूनही तुलनेने अधिक आहे. सरकारने संशोधनाला प्रोत्साहन देऊन पर्यावरणपूरक उद्योगांना मदत केली पाहिजे.

प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरू शकते. कापडी पिशव्या, स्टीलच्या बाटल्या आणि टिकाऊ वस्तू दीर्घकाळ वापरता येतात. त्यामुळे वारंवार नवीन वस्तू खरेदी करण्याची गरज राहत नाही. स्थानिक कारागीर आणि लघुउद्योगांनाही यामुळे रोजगार मिळू शकतो.

निसर्ग आणि मानव यांचे नाते परस्परावलंबी आहे. पर्यावरणाचे नुकसान म्हणजे शेवटी मानवाचेच नुकसान होय. पृथ्वीवरील संसाधने मर्यादित आहेत. आपण आज केलेल्या चुका भविष्यातील पिढ्यांना भोगाव्या लागू शकतात. त्यामुळे शाश्वत विकासाची संकल्पना स्वीकारणे अत्यंत गरजेचे आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही आजची मोठी गरज आहे.

प्लास्टिक प्रदूषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी जागतिक स्तरावर सहकार्य आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघ आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्था प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अनेक देश एकत्र येऊन जागतिक करार करण्याच्या दिशेने काम करत आहेत. समुद्रातील प्लास्टिक कमी करण्यासाठी विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत. तथापि, या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी प्रत्येक देशाने आणि प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण दैनंदिन जीवनात किती प्लास्टिक वापरतो, त्याचे पर्यावरणावर काय परिणाम होतात आणि आपण त्यात कसा बदल करू शकतो याचा विचार करण्याची ही वेळ आहे. केवळ एका दिवसापुरती जनजागृती न करता ती वर्षभर सातत्याने टिकवणे आवश्यक आहे.आजच्या काळात मुलांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. लहानपणापासूनच मुलांना प्लास्टिकचे दुष्परिणाम समजावून सांगितले पाहिजेत. घरात आणि शाळेत पर्यावरणपूरक सवयी लावल्या पाहिजेत. मुलांनी स्वतः प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा संकल्प केला तर भविष्यात समाजात मोठा बदल घडू शकतो.

प्लास्टिकमुक्त समाज निर्माण करण्यासाठी माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची आहे. वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने पर्यावरण विषयक माहिती लोकांपर्यंत पोहोचवता येते. यशस्वी उपक्रमांची उदाहरणे समाजासमोर मांडल्यास इतरांनाही प्रेरणा मिळते.

अनेक गावांनी आणि शहरांनी प्लास्टिकमुक्त होण्याचा आदर्श निर्माण केला आहे. काही गावांमध्ये प्लास्टिक पिशव्यांवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कापडी पिशव्यांचा वापर सुरू केला आहे. काही शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाच्या आधुनिक पद्धती वापरल्या जात आहेत. अशा यशस्वी प्रयोगांचा प्रसार होणे गरजेचे आहे.

आर्थिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होऊ देणे धोकादायक आहे. विकासाचा खरा अर्थ म्हणजे मानवाचे जीवनमान सुधारताना पर्यावरणाचे रक्षण करणे होय. जर पृथ्वीच सुरक्षित राहिली नाही तर कोणताही विकास निरर्थक ठरेल. म्हणूनच प्लास्टिकमुक्त पृथ्वी ही केवळ पर्यावरणवाद्यांची कल्पना नसून मानवाच्या अस्तित्वाशी निगडित गरज आहे.

आज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणे कठीण असले तरी तो मोठ्या प्रमाणात कमी करणे शक्य आहे. त्यासाठी शासन, उद्योग, संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. 'रिड्यूस, रीयूज आणि रिसायकल' या तत्त्वांचा अवलंब करणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरज नसताना प्लास्टिक वापरणे टाळले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा आपल्याला पर्यावरणाशी असलेले आपले नाते पुन्हा दृढ करण्याची प्रेरणा देतो. पृथ्वी ही आपली सामायिक संपत्ती आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारणे म्हणजे निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न होय.

आज जर आपण सजग झालो नाही तर भविष्यातील पिढ्यांना प्रदूषित पृथ्वी वारसा म्हणून मिळेल. नद्या, समुद्र, जंगल आणि हवा यांचे संरक्षण करण्यासाठी प्लास्टिकमुक्त समाजाची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून आपण पृथ्वीचे सौंदर्य आणि संतुलन जपू शकतो.

या आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिनानिमित्त प्रत्येकाने एक छोटा संकल्प करणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी पृथ्वी निर्माण करण्यासाठी सक्रिय योगदान देऊ.

कारण पृथ्वी वाचली तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील. निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही त्या दिशेने टाकलेली महत्त्वपूर्ण पायरी आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**